❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शनिवार, दि. ०१ ऑगस्ट २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २१७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या


नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

## थोडक्यात...



### संसदेत पप्पू यादव पुजाऱ्याच्या वेशात

**नवी दिल्ली: दैनिक संध्या**

विरोधी पक्षाच्या खासदारांनी शुक्रवारी संसद परिसरात राम मंदिराच्या देणगी चोरीवरून आंदोलन केले. खासदार पप्पू यादव पुजाऱ्याच्या वेशात दानपेटी घेऊन पोहोचले. ते मकर दरवाजाजवळ बसले. विरोधी पक्षाच्या खासदारांनी एकेक करून त्यांच्या दानपेटीत देणगी टाकली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही देणगी दिली. यासोबतच खासदार 'अमित शहा संसदेतून गायब का?' असे लिहिलेले बॅनर घेऊन पोहोचले होते. इकडे लोकसभा आणि राज्यसभेत सकाळी 11 वाजता कामकाज सुरू झाले. परंतु विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभा दुपारी 12 वाजेपर्यंत आणि राज्यसभा 3 ऑगस्टपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. आज लोकसभेत जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) विधेयक, 2026 मंजूर झाले. केंद्रीय मंत्री नित्यानंद राय यांनी याचा प्रस्ताव मांडला. तर सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांची संख्या वाढवण्याशी संबंधित सुधारणा विधेयकावर चर्चा होऊ शकते.

# भिवंडीत ४ मजली इमारत कोसळली

### ९ जणांचा मृत्यू : ४ ते ५ जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती; बचावकार्य सुरू



**■ भिवंडी (दै. संध्या)**

भिवंडीमध्ये गुरुवारी मध्यरात्री एक चार मजली इमारत कोसळल्याची भीषण दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत 9 जणांचा मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. तर, 4 ते 5 जण अद्याप ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफ आणि पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले आहे.

इमारत कोसळल्याची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि एनडीआरएफच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, दुर्घटनाग्रस्त इमारतीपर्यंत यंत्रणा पोहोचण्यासाठी रस्ता नव्हता. त्यामुळे इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ असलेली एक चाळ जेसीबीच्या साहाय्याने तोडून बचाव पथकाने आत प्रवेश मिळवला. भिवंडीतील इमारत दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त करत मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या प्रकरणात तात्काळ गुन्हा दाखल करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिल्याची माहिती त्यांनी दिली. जखमींवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थनाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. भिवंडीतील इमारत कोसळल्याच्या भीषण दुर्घटनेनंतर राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याचा आढावा घेतला. या इमारतीबाबत प्रशासनाने आधीच धोकादायक असल्याची पूर्वकल्पना देत दोन वेळा नोटीस बजावली होती आणि येथील सर्व ३० कुटुंबांना सुरक्षितपणे बाहेर काढले होते; मात्र, दुर्दैवाने काही जण पुन्हा आत गेल्याने त्यांच्यावर काळाने घाला घातला, अशी माहिती महाजन यांनी दिली. अद्यापही ढिगाऱ्याखाली एनडीआरएफकडून शोधकार्य युद्धपातळीवर सुरू असून, दुर्घटनेमुळे शेजारील दुसरी इमारतही खचल्याचे निदर्शनास आल्याने प्रशासनाने तीदेखील तातडीने रिकामी केली आहे. दरम्यान, या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली असून, त्यांना शासनाकडून लवकरच मदत दिली जाईल, असे महत्त्वपूर्ण आश्वासन गिरीश महाजन यांनी दिले आहे.



# बीडमध्ये मोठा मासा गळाला

### लाच घेताना वन अधिकाऱ्याला बेड्या, प्रशासनात खळबळ

**■ बीड (दै. संध्या)**

मुंबईत लाच लुचपत प्रतिबंधक (ACB) विभागाने धाड टाकून महापालिकेतील एका सुपरवायजरला रंगेहात अटक केली होती. 40 हजारांची लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली होती. विशेष म्हणजे, गेल्या काही महिन्यात एसीबीच्या कारवाईचा धडाका पाहायला मिळत असून अनेक सरकारी नोकरदार लाच घेताना जाळ्यात अडकत आहेत. आता, बीड जिल्ह्यातही आज मोठी खळबळ उडवणारी कारवाई झाली आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला उपस्थित राहिल्यानंतर, विभागीय वन अधिकाऱ्यास त्यांच्याच घरी लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली. बीडमधील (Beed) या कारवाईने जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबल उडाली आहे.

उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार दोन दिवसीय बीड दौऱ्यावर असून आज त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यासंमवेत, जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली. यावेळी, जिल्हा विकासाच्या दृष्टीने त्यांनी काही महत्त्वाच्या सूचनाही केल्या आहेत. विशेष म्हणजे, या बैठकीला उपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यास काही तासांतच लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली. श्रीनिवास लखमावाड असे लाचखोर अधिकाऱ्याचं नाव असून त्यांच्या राहत्या घरी 45 लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यास रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे जिल्ह्यातील प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. सुनेत्रा पवार यांच्यासमवेतची जिल्हा नियोजन समितीची बैठक संपल्यानंतर विभागीय वन अधिकारी श्रीनिवास लखमावार हे त्यांच्या निवासस्थानी परतले. याच ठिकाणी त्यांनी तब्बल 45 लाख रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप आहे. पूर्वनियोजित सापळा रचत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांना लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. कारवाईनंतर अधिकाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, या प्रकरणी पुढील चौकशी सुरू आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणेत भ्रष्टाचाराविरोधात मोठा संदेश गेल्याची चर्चा आहे.



# संपादकीय

## गुन्हेगारी नांगरा, विश्वास पिकवा

**कायदा-सुव्यवस्थेची शेती नीट नांगरली, गुन्हेगारीचे तण उपटून फेकले, तरच जनतेच्या मनात विश्वास पिकवता येईल.**

ज्या शेतात तण वाढते, तेथील पिकांची वाढ खुंटते. अशा वेळी शेतकऱ्याला तणकट उपटून फेकावे लागते. नागपुरातही सध्या गुन्हेगारीची तणकटे वाढू लागली आहेत. ती वेळीच उपटून टाकण्यासाठीच विश्वास नांगरे पाटील यांच्यासारख्या धडाडीच्या अधिकाऱ्याची पोलिस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली. मात्र, त्यांना शहराचा पूर्ण अंदाज येण्यापूर्वीच गुन्हेगारांनी आपली डोकी वर काढण्यास सुरुवात केली आहे.

शांत शहर, ही नागपूरची ओळख. मध्यरात्रीही मुलीबाळी दुचाकीवरून निर्धास्त फिरताना दिसतात. त्यामागे असते सुरक्षिततेची भावना, जी पोलिस यंत्रणेवरील विश्वासातून निर्माण होते. अलीकडे मात्र किरकोळ कारणाहून गुन्हे घडू लागले आहेत. केवळ रागाने पाहिले म्हणून फुटाळ्यात खून होतो. झोपमोड झाली म्हणून झोन चौकात एकाचा जीव घेतला जातो. अवघ्या दहा रुपयांसाठीही हत्या होते. या व्यक्तिगत कारणातून घडलेल्या घटना आहेत; पण अवघ्या शहराचे चित्त विचलित व्हावे, अशा काही घटना गेल्या आठ दिवसात घडल्या. गोरेवाडा-पिटेसूर रस्त्यावर मध्यरात्री एका टोळीने अक्षरशः धुमाकूळ घातला. रस्त्यावरून जाणाऱ्यांना चाकूचा धाक दाखवून लुटले. सायकलस्वार असो, रिक्षाचालक असो किंवा झोमॅटोचा डिलिव्हरी बॉय, कोणीही त्यांच्या तावडीतून सुटले नाही. केटरिंगची टीम घेऊन जाणाऱ्या एका ऑटोचालकाने पैसे देण्यास नकार दिला, तर नराधमांनी त्याच्या पोटात सपासप चाकू खुपसले. तो मृत्यूशी झुंज देत असतानाच त्याच्या खिशातील तीन हजार रुपयेही त्यांनी काढून घेतले. पोलिसांनी काही तासांत आरोपींना अटक केली, हे कौतुकास्पदच. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, शहराच्या रस्त्यावर कुणालाही लुटण्याची, चाकूने भोसकण्याची आणि कायदा हातात घेण्याची हिंमत या गुन्हेगारांत येते कुठून?

हा प्रकार घडतो न घडतो तोच जयताळ्यात हातात लाठ्या, कोयते घेऊन आलेल्या टोळक्याने परिसरात दहशत माजवली. भेटेल त्याला मारहाण, शिवीगाळ करीत घराबाहेर उभ्या वाहनांची तोडफोड केली. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले. या विकृतीला बळ मिळते कुठून? नागपूर ही गुन्हेगार पिकविणारी सुपीक भूमी कधीच नव्हती. ही कायद्याचे रक्षण करणाऱ्या परंपरा जपणारी भूमी आहे. भोसल्यांच्या काळातील कोतवाल व्यवस्था असो किंवा ब्रिटिशकालीन पोलिस यंत्रणा, गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याची परंपरा या शहराने पाहिली आहे. नागपूरची लोकसंख्या अवघी एक लाख चाळीस हजार असताना शहरात सुमारे सातशे पोलिस होते, असा उल्लेख आढळतो. आज शहर कमालीचे विस्तारले आहे. मनुष्यबळाची कमतरता आहे, हे वास्तव नाकारता येत नाही. प्रत्येक ठिकाणी पोलिस पोहोचू शकत नाहीत, हेही खरे. पण त्यापेक्षा मोठा प्रश्न आहे, गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा धाक उरला आहे का?

विश्वास नांगरे पाटील हे धाडसी कारवायांसाठी ओळखले जाणारे अधिकारी आहेत. पुण्यात त्यांनी रेव्ह पार्टीचे जाळे उद्ध्वस्त केले. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात त्यांनी शौर्य गाजविले. राष्ट्रपती पदकाने त्यांचा गौरव झाला. ते प्रेरणादायी वक्ते, युवकांचे मार्गदर्शक आणि तंत्रस्नेही अधिकारी म्हणूनही परिचित आहेत. त्यामुळे नागपूरकरांच्या अपेक्षाही त्यांच्याकडून मोठ्या आहेत. पोलिस आणि नागरिक यांच्यातील संवाद वाढविण्यासाठी पोलिस आयुक्तांनी काही उपक्रम सुरू केले आहेत. त्याचे सकारात्मक परिणाम पुढे दिसतीलही. मात्र, सध्या नागपूर एका संवेदनशील वळणावर उभे आहे. हे शहर मेट्रो सिटी म्हणून विकसित होत आहे. शिक्षणाचे माहेरघर, आयटी आणि उद्योगांचे नवे केंद्र म्हणून त्याची ओळख निर्माण होत आहे. अशा शहरात गुन्हेगारीचे तण वाढले तर मन कुणाचे रमेल? ना उद्योजक येतील, ना गुंतवणूकदार. तेव्हा खाकीची जरब वाढवा, जनतेचा विश्वास जिंका!

# गुरु वचन

## आई–वडिलांना विसरू नका

खूप छान गोष्ट आहे. मुलगा आणि वडिलांच्या नात्याची. हल्ली आई–बाप मुलांना जड झाले आहेत. त्यांना वृद्धाश्रमात धाडले जात आहे. यावरच ही कथा आहे.

एकदा एक वयोवृद्ध बाप आपल्या उच्च शिक्षित मुलासोबत घराच्या छतावरती बसला होता. तेथे एक कावळा आला. मुलाला बापाने विचारले, ते काय आहे? मुलगा म्हणाला कावळा. पुन्हा दुसऱ्यांदा बापाने विचारले, ते काय आहे? मुलाने पुन्हा उत्तर दिले कावळा.

तिसऱ्यांदाही बापाने विचारले ते काय आहे? मुलाने जरासे दात–ओठ खात म्हटले, कावळा. मग ते दोघे घरात गेले. त्याला पुन्हा बापाने विचारले ते आत्ता आले होते ते काय होते? मुलाचा संयम सुटला होता त्याने ओरडत सांगितले, समजत नाही का? कावळा...... कावळा... कावळा.

पाचव्यांदा बापाने विचारले ते आपण पाहिले ते काय होते? मुलगा आता मात्र जाम भडकला त्याने त्यांना सांगितले, का टाईमपास करताय? तुम्हाला कितीदा सांगितले तो कावळा होता म्हणून, तरी तुम्हाला समजत नाही का? का जाणून– बुजून त्रास देताय?

मग त्या वयोवृद्ध बापाने त्या मुलाला घरातील एक डायरी आणायला सांगितली. त्याने ती आणली, त्यात हीच कथा लिहिली होती.

परंतु, ती थोडी वेगळी होती. त्या बापाच्या जागी एक लहान मुलगा होता. त्याने बापाला एक–दोन नाही तर तब्बल २५ वेळा हाच प्रश्न केला होता, आणि तितक्याच वेळा त्याच्या वडिलांनी त्याच्या प्रश्नाला हसत हसत उत्तर दिले.

त्यांना त्याच्या विचारण्याचा मुळीच राग येत नव्हता, उलट त्यांना त्या मुलाचा निरागस स्वभाव आणि त्याचे ते विचारणे आवडत होते. तो बाप त्या मुलाचाच होता जो त्याला केवळ पाच वेळा विचारल्यावर त्यांच्यावर खेकसला.

फरक फक्त हाच, की मुलासाठी बापाने केलेले कष्ट, त्यांनी सहन केलेल्या सर्व वेदना तो विसरला होता. उलट त्याने वडिलांना केवळ दु:खच दिले. लक्षात ठेवा. तुमच्या आई–वडिलांनी तुमच्यासाठी कितीतरी कष्ट केले आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी केवळ दु:खच देत आहात? आई–वडिलांना विसरू नका. त्यांनी केलेल्या कष्टांना विसरू नका.

# दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | | 8 | | | 4 | 6 | |
| | 6 | | 7 | | | | 2 | |
| | 8 | 7 | | | 9 | 3 | | 5 |
| 6 | | | 5 | | | 1 | 9 | 2 |
| | 2 | | | | | | 5 | |
| 7 | 1 | 5 | | | 4 | | | 8 |
| 3 | | 2 | 4 | | | 9 | 7 | |
| | 9 | | | | 2 | | 8 | |
| | 7 | 1 | | | 6 | | | 3 |

**: सूडोकु :**


खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०२६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 3 | 7 | 8 | 2 | 6 | 9 | 4 |
| 4 | 8 | 6 | 9 | 1 | 5 | 2 | 7 | 3 |
| 7 | 9 | 2 | 4 | 6 | 3 | 8 | 5 | 1 |
| 8 | 2 | 4 | 6 | 9 | 7 | 3 | 1 | 5 |
| 6 | 7 | 1 | 5 | 3 | 8 | 9 | 4 | 2 |
| 3 | 5 | 9 | 2 | 4 | 1 | 7 | 8 | 6 |
| 9 | 4 | 8 | 3 | 5 | 6 | 1 | 2 | 7 |
| 2 | 6 | 5 | 1 | 7 | 9 | 4 | 3 | 8 |
| 1 | 3 | 7 | 8 | 2 | 4 | 5 | 6 | 9 |

# 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२७



**आडवे शब्द**

१. अननुभवी
५. देवापाशी मागितलेला निर्णय
६. पवित्र
९. एक सुगंधी वनस्पती
१०. जंगलातील प्राणी
१२. वारा
१३. वाईट असल्यास आयुष्य नासवणारी
१४. नासाडी, नाश
१५. हात
१६. चटकन
१८. शपथ
१९. भाज्या घालून केलेला भात
२०. सरसकट
२२. खानदान, कूळ
२३. रमापती
२५. दारूचा प्रकार
२६. कपाळ
२७. कशा प्रकारचा?
२९. वर्ष
३१.गाडीचे छत
३३. सोन्याचा धागा
३४. सुंदर तरुणी
३५. डोळे
३६. असह्य वेदना
३८. लक्ष्मी
४२. पंचमहाभूतापैकी अग्नीचे रूप
४३. टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास
४६. आकर्षक
४८. मूळ अर्थ धनुष्य, उद्धट, दांडगा (ला.)
४९. यापेक्षा फळे चिरून खाणे चांगले!
५०. च्या बरोबर
५१. क्षण (हिंदी)
५३. भंगार (हिंदी)
५५. अस्सल मातीतले
५६. खुंट, आंचळ
५७. घाबरट
५९. सुविधा
६०. हक्क सांगणारा, वैरी
६२. मध
६४. पांढुरका, कडक
६६. नासाडी, धूळधाण
६८. पत्र, टपाल
६९. गवताचे पान
७०. डोंगराचा सुळका, पोळीची किनार
७२. वाळवंटातून आलेला फुलांचा राजा
७४. स्तुती करणारा दरबारी
७५. स्वत:ला
७६. रघुपती बरोबर घेतली जाणारी रामाची आणखी दोन नावे
८०. दाक्षिणात्यांच्या जेवणातील हा पदार्थ इतका मुख्य की त्याला 'अन्न' असेच संबोधतात
८१. मृत्यू नसलेला
८२. पकडण्याचे साधन– मासा किंवा काहीही!
८३. चांदोबाची खेळण्याची जागा

**उभे शब्द**

१. 'फारच मोठे प्रास्ताविक' याअर्थी प्रचलित म्हण
२. उत्तराधिकारी
३. रानरेडा
४. प्रतिष्ठा
५. गांधारीचे पुत्र
६. पोटाला चांगला नसलेला पोळीला पर्याय
७. अरण्य
८. यंदा पावसाळ्यात अशा पावसाचा अभावच होता
१०. वरपांगी
११. एवढी तरी हवीच अशी हालचाल
१२. घागरा
१३. समस्या, पेच
१५. विद्या
१७. सत्व
१८. दूध न देणारी गाय
१९. पुण्याचा रहिवासी
२१. घोडागाडी
२४. मत्स्य
२६. हिंदुस्तान
२८. चाणक्यनीती
३०. सोन्याचे नाणे
३२. उद्याच्या नंतरचा दिवस
३३. जय मिळवून देणारे
३७. विविध
३९. मस्ती, गर्व
४०. समय
४१. आजपर्यंत
४३अ. वजनाला भारी
४४. किंमत
४५. सैन्याचा दाणागोटा
४६. महात्मा गांधीजींचे नाव
४७. चषक
४८. फरशीनंतर असलेला लादीचा प्रकार
५०. सरळ मोठा वासा
५२. मनाची इच्छा
५३. टाळ्यांनी मिळालेली मोठी दाद
५४. विरोध, प्रतिबंध
५६. विषमच्या विरुद्ध
५८. भीती
६१. प्रमाणपत्र
६३. कधी रावाचा होतो, कधी याचा राव!
६५. पोस्ट ऑफीस (हिंदी)
६७. नट्टापट्टा
६९. पाचोळा
७१. खेळी
७३. पोशाखाची कळ
७४. नशीब, दैव
७५. अभिप्राय
७६. राघव
७७. संताप
७८. अग्नी, ज्वाळा
७९. अंत:करण

**जम्बो शब्दकोडे क्र. १०२६ चे उत्तर**

आडवे उत्तर १.नाशवंत ३.वसुंधरा ५.आडमिळकत ९.फासा १०.माकड १२.मळ १३.माननीय १६.गाळसाळ १८.यमसदनाला पाठविणे २४.राका २५.दानपत्र २७.नाविक दल २८.रमावर ३०.सुळका ३१.माता ३२.वण ३३.रसना ३४.जमा ३६.नाद ३७.राधा ३८.हवन ३९.राजीव लोचन ४०.खरडपट्टी ४२.परि ४३.कास ४५.तव ४६.येन ४७.राबता ४८.मनमुराद ५०.ताई ५२.दास ५३.जंगली जनावर ५५.महाशय ५७.नकार ५९.बासरी ६०.दम ६१.लगत ६३.करारमदार ६४.पारावार ६५.महाराज ६६.कारभार

उभे उत्तर : १.नाममात्र २.वंदनीय ३.वसा ४.रमा ५.आड ६.मिसळ ७.कमळ ८.तळ ११.कवठ १४.यम सदन १५.विनाकारण १६.गाणे १७.सामानसुमान १९.दरा २०.पाचावर धारण बसणे २१.विष २२.पत्रकार परिषद २३.कविता २६.पळ २७.नामनिराळा २९.रस ३२.वदन ३४.जव ३५.अवयव ३६.नाचता येईना ३७.राख ३८.हट्टी ४१.पल्ला ४३.कान ४४. समुदाय ४५.तवंग ४८.मनोहारी ४९.रास ५०.ताजगी ५१.सरकार ५३.जंगल ५४.वनराज ५५.मस ५६.समरस ५८.रमणी ५९.बारका ६०.दवा ६२.तम ६३.करा ६४.पार

# इतिहासात आजचा दिवस

## आंतरराष्ट्रीय

- ५२७– जस्टीनियन पहिला बायझेन्टाईन सम्राटपदी.
- १४६१ – एडवर्ड चौथा इंग्लंडच्या राजेपदी. स्पेनमधून हकालपट्टी.
- १४९८ – क्रिस्टोफर कोलंबसने व्हेनेझुएलात पाउल ठेवले.
- १६६४ – सेंट गॉट्टहार्डची लढाई – ऑट्टोमन साम्राज्याचा पराभव.

## राष्ट्रीय

- २००६ – हरियाणात बस कालव्यात कोसळून ७ शाळकरी मुलांचा मृत्यू झाला.
- २००७ – कोईम्बतूर बॉम्बस्फोट प्रकरणी बाशासह ५९ जणांना दोषी ठरवण्यात आले.
- २००७ – उत्तरप्रदेशात नाव उलटल्याने २८ जण ठार झाले.

## जन्म

- ई.स.पू. १० – क्लॉडियस, रोमन सम्राट.
- १२६ – पर्टिनॅक्स, रोमन सम्राट.
- १३१३ – कोगोन, जपानी सम्राट.
- १३७७– गो–कोमात्सु, जपानी सम्राट.
- १८५६ – जॉर्ज कुल्टहार्ड, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १८५७ – जॉन हॅरी, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १८६१ – सॅमी जोन्स, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९०० – ओट्टो नथिंग, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९१० – मोहम्मद निसार, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९२४ – फ्रँक वॉरेल, वेस्ट ईंडीयन क्रिकेट खेळाडू.
- १९३५ – जॉफ पुलर, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.

## निधन

- ३७१ – संत युसेबियस.
- ११३७ – लुई सहावा, फ्रांसचा राजा.
- १७१४ – ऐन, इंग्लंडची राणी.

# उपदेशकथा

## अहंभाव

एके दिवशी भोजराजा आपल्या निवडक मित्रांना घेऊन क्रीडोद्यानाकडे निघाला. वाटेतही अर्थातच काव्यासंबंधीच्या चर्चा चाललेल्या होत्या. एवढ्यात रस्त्यात एक तपस्वी त्यांना सामोरा आला. भक्तीभावाने राजाने हात जोडले व तो म्हणाला, महाराज आपल्यासारख्या तपस्वीजनाचं दर्शन केवळ भाग्यवंतांनाच होतं. पण आपलं निवासस्थान कोणतं? भोजनाची आपण काय व्यवस्था करता? राजाच्या या प्रश्नावर तपस्व्याने स्मित केले व म्हणाला, राजा, वन हेच माझं निवासस्थान, तिथं वृक्षांची सुमधुर फळं विनासायास मिळतात. जागोजागी नद्यांचं शीतल व मधुर पाणी असतं. सुंदर लतापल्लवांनी बनलेली सुकोमल शय्या असते. कोणत्याच गोष्टीची कोणाकडेच याचना करावी लागत नाही. राजा तपस्व्याचे ते अमृततुल्य बोल ऐकतच राहिला. तेव्हा राजा, आम्ही कोणाचीच कशासाठीही याचना करीत नाही आणि कोणाकडूनच काहीही घेत नाही. त्या तपस्व्याने शांतपणे सांगितले. ते ऐकून राजाने तर त्या तपस्व्याच्या चरणांवर लोटांगण घातले. महाराज, मी अनेकांना आश्रय देतो, अनेकांच्या इच्छा पूर्ण करतो. हा अहंकार माझ्या मनात मूळ धरण्यापूर्वीच तुम्ही खुंटून टाकलात. तुमच्या या कृपेचं ऋण मला जन्मोजन्मी फेडता येणार नाही. राजा भक्तीभावाने त्यांच्या चरणांवर डोके ठेवून म्हणाला.

कथा उपदेश : अहंकाराचे ना गर्वाचे घर कधी ना कधी खाली होतेच. याकरीता अंगी नम्रता बाळगावी.

# : SMS :

Teacher: Chintu, agar tumhare paas 10 aam ho aur main 4 maang lu to kitne bachenge?
Chintu: Sir, 10 hi. Kyunki main dunga hi nahi.

# हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २५.६ | २४.१ |
| अहमदनगर | २५.९ | २२.८ |
| अकोला | ३१.२ | २५.६ |
| अमरावती | ३५.६ | २६.१ |
| बीड | ३०.८ | २५ |
| भंडारा | ३१.७ | २५.६ |
| बुलढाणा | ४२.७ | २७.५ |
| चंद्रपूर | २७.८ | २५.६ |
| चेन्नई | ४१.१ | ३१.१ |
| नवी दिल्ली | ४४.६ | ३६.४ |
| धुळे | ३१.९ | २५.४ |
| गोंदिया | ३०.६ | २५.४ |
| जळगाव | ३४.६ | २५.५ |
| कोल्हापूर | २६.९ | २२.५ |
| लातूर | २५.३ | २३.१ |
| मुंबई | ३५.३ | ३२.३ |
| नागपूर | ३४.३ | २५.१ |
| नांदेड | २६.४ | २३.८ |
| नंदूरबार | २९.५ | २५.८ |
| नाशिक | २६.८ | २३ |
| पुणे | २५.७ | २२.७ |
| पंढरपूर | ३२ | २५.१ |
| सातारा | २७.३ | २१.४ |
| सांगली | ३०.३ | २३.३ |
| सोलापूर | ३१.१ | २५.२ |
| वर्धा | ३२.३ | २५.६ |

# आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आपले कर्तृत्व आणि कुवत सिद्ध करण्याच्या संधी मिळतील.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर व्यापारी व्यवहाराचा नेमका कल लक्षात घेऊन व्यवहाराची दिशा ठरविणे आवश्यक ठरेल.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा :पश्चिम देवधर्म, पूजाअर्चा करण्यात वेळ कसा जाईल कळणार नाही. मानसिक समाधान मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम कामाच्या निमित्ताने केलेला प्रवास नफा देईल. आर्थिकदृष्ट्या होणाऱ्या वाटचाली वेगवान होतील.

**मिथुन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: दक्षिण कायदेशीर पुरावे असलेले कागदपत्र गहाळ होणार नाही याची काळजी घ्या.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा : पश्चिम मनावर येणारी काही दडपणे दूर करण्यासाठी घरातील ज्येष्ठांचा सल्ला अवश्य घ्या.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण घरातील सदस्यांपैकी एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस थाटामाटात साजरा कराल. आरोग्य उत्तम राहील.

**मकर :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: उत्तर नोकरदारांना वरिष्ठांचे बोलणे सहन करावे लागेल. वृद्धांनी आपले पथ्यपाणी व तब्येत सांभाळावी.

**सिंह :** शुभ रंग:भूरा, शुभ दिशा:उत्तर वडीलधारी मंडळीनी दिलेला सल्ला घेऊन कामात केलेले बदल अफलातून यश देतील.

**कुंभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण बेकारांना कामधंदा मिळेल. अविवाहितांचे विवाहाचे प्रश्न सुटतील. आर्थिक प्रश्न सुटतील.

**कन्या :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर सामाजिकदृष्ट्या मोठे कार्यविश्व उभे करू शकाल. एखाद्या घरगुती कार्यक्रमाचे आयोजन कराल.

**मीन :** शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम थोरामोठ्यांच्या गाठीभेटीतून बौद्धिक वर्चस्वही सिद्ध करता येईल. बेकारांना कामधंदा मिळेल.

# पंचांग

| | |
|---|---|
| १ ऑगस्ट २०२६ | २०:४५:०२ |
| शनिवार | योग:शोभन २३:२२:१६ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज १०:५३:०५ |
| आषाढ शके | करण:विष्टि २३:०७:३३ |
| संवत्– १९४८ | सूर्य:कर्क |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:कुम्भ |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– आषाढ | मुस्लिम मास – सफर |
| ऋतु– सौर वर्षा | तारीख – १७ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:तृतीया २३:०७:३३ | लोकमान्य बाळ गंगाधर |
| नक्षत्र:शतभिषा | टिळक पुण्यतिथी |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘मेड इन इंडिया’ रोबोटिक तंत्रज्ञानाची कमाल

**पुणे : दैनिक संध्या**

भारतात विकसित करण्यात आलेल्या रोबोटिक तंत्रज्ञानाने आणि भारतीय डॉक्टरांच्या कौशल्याने पुन्हा एकदा जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलच्या 'मेड इन इंडिया' एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक प्रणालीच्या सहाय्याने कोलंबियामध्ये सुमारे २२,००० किलोमीटर दूर बसलेल्या शल्यचिकित्सकांनी इंदूरमधील एका रुग्णावर यशस्वी रोबोटिक स्लीव्ह गॅस्ट्रेक्टॉमी शस्त्रक्रिया करून भारतीय तंत्रज्ञानाची ताकद जगासमोर सिद्ध केली आहे. ही ऐतिहासिक टेलीसर्जरी कोलंबियातील हॉस्पिटल इंटरनॅशनल दि कोलंबिया आणि इंदूर येथील मोहक बॅरियाट्रिक्स अँड रोबोटिक्स यांच्यात सुमारे २२,००० किमी लांबीच्या फायबर नेटवर्कद्वारे पार पडली. या यशामुळे अत्याधुनिक शस्त्रक्रियांसाठी भौगोलिक अंतर हा अडथळा राहिलेला नसल्याचे सिद्ध झाले आहे. या दूरस्थ शस्त्रक्रियेचे नेतृत्व एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर श्रीवास्तव यांनी डॉ. व्हिक्टर राऊल कॅस्टिलो मँटिला आणि डॉ. जोनाथन कासेरेस प्राडा यांच्यासह कोलंबियातून केले. तर इंदूरमध्ये रुग्णासोबत उपस्थित असलेल्या शस्त्रक्रिया पथकाचे नेतृत्व प्रख्यात बॅरियाट्रिक सर्जन डॉ. मोहित भंडारी यांनी केले. त्यांच्यासोबत डॉ. अभिषेक तिवारी यांनीही संपूर्ण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. ही संपूर्ण शस्त्रक्रिया २७५–२८५ मिलीसेकंद नेटवर्क लेटन्सी (राउंड ट्रिप टाइम) वर यशस्वीरित्या पार पडली. यामुळे एसएसआय मंत्रा प्लॅटफॉर्मची अचूकता, स्थिरता आणि विश्वासार्हता जागतिक स्तरावर पुन्हा एकदा सिद्ध झाली.

### गणना फॉर्म बीएलओकडे तातडीने जमा करा

#### जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे आवाहन

**पुणे : दैनिक संध्या**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील बहुतांश मतदारांनी गणना (Enumeration) फॉर्म भरून दिला आहे. मात्र, काही मतदारांनी भरलेले फॉर्म अद्यापही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे परत केलेले नाहीत. अशा सर्व मतदारांनी कोणताही विलंब न करता आपला भरलेला गणना फॉर्म संबंधित बीएलओकडे जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. भारतीय निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमानुसार प्राप्त होणाऱ्या गणना फॉर्मच्या आधारे मसुदा मतदार यादी तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे ज्यांनी गणना फॉर्म भरला असूनही तो अद्याप बीएलओकडे सुपूर्द केलेला नाही, त्यांनी तो तातडीने जमा करावा. वेळेत गणना फॉर्म जमा केल्यास संबंधित मतदाराचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होण्याची प्रक्रिया सुनिश्चित होईल. त्यामुळे कोणत्याही पात्र मतदाराचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून वंचित राहणार नाही. नागरिकांनी या प्रक्रियेस सहकार्य करून भरलेले गणना फॉर्म त्वरित संबंधित बीएलओकडे जमा करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.



### पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. लहू अण्णा निवंगुणे यांचा जाहीर सत्कार

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी मा. लहू अण्णा निवंगुणे यांची निवड झाल्याबद्दल पुणे जिल्हा ग्रामीण राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक)च्या वतीने जिल्हाध्यक्ष विजय जाधव यांच्या हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी काँग्रेस विचारसरणी मजबूत करण्यासाठी तसेच कामगार संघटना अधिक प्रभावीपणे उभी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास युवक काँग्रेसचे पुणे जिल्हाध्यक्ष उमेश पवार, राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) महिला अध्यक्षा शीतलताई कोतवाल, पुणे शहर इंटकचे सरचिटणीस श्री. गाडेकर, इंटक पुणे जिल्हा कार्याध्यक्ष शंकर जाधव, जिल्हा उपाध्यक्ष गोविंदराव आटक, अनिल लगस, सुनील चौगुले, रवी चव्हाण, रमेश सावंत, तसेच सौ. निकम मॅडम – पुणे जिल्हा महिला सचिव (इंटक) यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पुणे जिल्हा ग्रामीण राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक)च्या संघटनात्मक विस्ताराच्या अनुषंगाने विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये सौ. सुमनताई सातपुते यांची पुणे जिल्हा महिला अध्यक्षा, रोहन पठाण व संजय भोसले यांची पुणे जिल्हा उपाध्यक्ष, मोहन निंबाळकर व विलास पवार यांची पुणे जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच तालुकास्तरावर प्रकाश सावंत (हवेली), राहुल पवार (पुरंदर), पोपटराव चौगुले (मुळशी), राजेश खुडे (भोर), तात्या शिंदे (मावळ) आणि युवराज पवार (इंदापूर) यांची तालुकाध्यक्ष म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली. अजित पवार यांची संपर्कप्रमुख, अर्जुन शिंदे यांची हवेली तालुका रिक्षा समन्वयक (ज्येष्ठ नेते), अनिल लगस यांची कलाकार विभाग समन्वयक, दगडू पवार यांची खडकवासला विधानसभा अध्यक्ष, कल्पना लगस यांची हवेली तालुका महिला अध्यक्षा तसेच सुरेखा लगस यांची महिला पदाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान संपन्न

**पुणे : दैनिक संध्या**



जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर श्री विघ्नहर सास्कृतिक भवन ओझर येथे आयोजित करण्यात आले. या शिबाराचे उद्घाटन आमदार शरद सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात एकूण २२ स्टॉलच्या माध्यमातून १ हजार ६४१ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. यावेळी जुन्नर-आंबेगाव उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे, तहसीलदार रणजीत भोसले, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, तालुक्यातील शासकीय विभागातील कार्यालय प्रमुख व पंचायत समिती सभापती / उपसभापती व जिल्हा व पंचायत समिती सदस्य आदी उपस्थित होते. तहसील कार्यालयातील संजय गांधी विभाग, पुरवठा विभाग, सेतू कार्यालय व महसूल विभाग उपस्थित होता. तसेच तालुक्यातील सर्व गावांचे ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी उपस्थित होते.

# पुण्यात छत्तीसगड टुरिझम बोर्डचा रोडशो

**वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनाला नवी चालना**

■ पुणे (दै. संध्या)



छत्तीसगडला विरंगुळा, वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनासाठी देशातील उदयोन्मुख पर्यटनस्थळ म्हणून अधिक प्रभावीपणे सादर करण्याच्या उद्देशाने छत्तीसगड टुरिझम बोर्डने उद्योग भागीदार फिक्कीच्या सहकार्याने पुण्यातील हयात रीजेन्सी येथे पर्यटन रोडशोचे आयोजन केले. या रोडशोमधून महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील पर्यटन उद्योगातील प्रतिनिधींमध्ये व्यावसायिक सहकार्य वाढविण्याबरोबरच राज्यातील पर्यटनस्थळांचा प्रचार करण्यावर भर देण्यात आला.

या कार्यक्रमाला छत्तीसगड टुरिझम बोर्डचे अध्यक्ष नीलू शर्मा, व्यवस्थापकीय संचालक विवेक आचार्य (आयएफएस), फिक्की छत्तीसगड टुरिझम समितीचे अध्यक्ष तसेच छत्तीसगड ट्रॅव्हल ट्रेड असोसिएशनचे अध्यक्ष जसप्रीत सिंह भाटिया यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय छत्तीसगडमधील आघाडीचे टूर ऑपरेटर्स, हॉटेल व्यावसायिक आणि ट्रॅव्हल एजंट्स यांनी पुणे व महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधींशी बी-टू-बी नेटवर्किंग आणि चर्चासत्रांद्वारे संवाद साधला.

उद्घाटनप्रसंगी नीलू शर्मा म्हणाले की, छत्तीसगडची भारतातील प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून ओळख अधिक बळकट करण्यासाठी हा रोडशो महत्त्वाचा ठरणार आहे. पर्यटन क्षेत्रातील भागीदारांशी झालेला संवाद अत्यंत फलदायी ठरला असून, छत्तीसगडचा समृद्ध आणि अस्सल अनुभव घेण्यासाठी सर्वांनी राज्याला भेट द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

व्यवस्थापकीय संचालक विवेक आचार्य यांनी सांगितले की, पर्यटनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्याबरोबरच पर्यटकांचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. पुणे आणि महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित भागीदारांनी छत्तीसगडमधील विविध पर्यटन सर्किट्सच्या प्रसारासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. निसर्ग, संस्कृती, वारसा आणि साहसी पर्यटनाचा सुंदर संगम असलेले छत्तीसगड आज देशातील पसंतीच्या पर्यटनस्थळांपैकी एक बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

जसप्रीत सिंह भाटिया यांनी सांगितले की, छत्तीसगड टुरिझम बोर्डसोबतच्या भागीदारीमुळे राज्याचा समृद्ध वारसा, वन्यजीव, आध्यात्मिक पर्यटन सर्किट्स आणि आदिवासी संस्कृतीचा व्यापक प्रचार करण्यासाठी नवी संधी उपलब्ध झाली आहे. अशा रोडशोमुळे पर्यटन उद्योगातील अर्थपूर्ण सहकार्याला चालना मिळून छत्तीसगडची पर्यटनस्थळ म्हणून ओळख अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


देशातील विविध शहरांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या आठ रोडशोंपैकी भुवनेश्वरनंतर पुणे हा दुसरा रोडशो ठरला. राज्याबाहेरील पर्यटन बाजारपेठ विस्तारण्याच्या आणि पर्यटन व्यवसायाशी थेट संबंध प्रस्थापित करण्याच्या व्यापक उपक्रमाचा हा एक भाग आहे.

रोडशोदरम्यान बी-टू-बी नेटवर्किंग सत्रांमध्ये पुणे आणि छत्तीसगडमधील पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधींनी व्यावसायिक सहकार्य आणि पर्यटनस्थळांच्या प्रसाराच्या संधींवर सविस्तर चर्चा केली. सायंकाळी छत्तीसगडच्या समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर आयोजित नेटवर्किंग डिनरसह एकदिवसीय रोडशोचा समारोप झाला.

चित्रकोट धबधबा, कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यान, सिरपूर, भोरमदेव मंदिर तसेच समृद्ध आदिवासी संस्कृती आणि नैसर्गिक सौंदर्यामुळे छत्तीसगड पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या रोडशोमुळे महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय आणि छत्तीसगड यांच्यातील संबंध अधिक दृढ होऊन पर्यटन विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## खडकवासला धरणातून मोठा विसर्ग; बाबा भिडे पूल पाण्याखाली

■ पुणे (दै. संध्या)



खडकवासला धरण साखळी क्षेत्रात झालेल्या संततधार पावसामुळे धरणातून मुठा नदीत मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे शुक्रवारी (ता. ३१) नदीपात्रातील रस्ता आणि बाबा भिडे पूल पाण्याखाली गेला असून, सुरक्षिततेसाठी पोलिसांनी हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद केला आहे. नदीपात्रातील रस्ता बंद झाल्याने नारायण पेठ, शनिवार पेठ आणि कोथरूड भागाकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. पोलिसांनी लोखंडी कठडे लावून नदीपात्राकडे जाणारे रस्ते बंद केले आहेत. परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी नदीपात्रातील संवेदनशील ठिकाणी अग्निशामक दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. पाणी ओसरेपर्यंत नागरिकांनी नदीपात्रातील रस्त्याचा वापर करू नये, असे आवाहन वाहतूक शाखेने केले आहे. नदीची पाणी पातळी वाढल्याने शिवाजीनगर परिसरातील डेंगळे पुलाखालील चेंबरजवळ २२ वर्षीय तरुण अडकला होता. दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास माहिती मिळताच कसबा पेठ अग्निशामक केंद्राचे जवान आणि स्थानिक जीवरक्षक राजू काची यांनी घटनास्थळी धाव घेतली. दोरी, शिडी आणि लाईफ जॅकेटच्या मदतीने २० मिनिटांत या तरुणाची सुखरूप सुटका करण्यात आली. अग्निशामक केंद्राचे जवान समीर शेख, समित दळवी, गणेश लोणारे राजेंद्र महाडीक, प्रसाद नाणेकर, संतोष अरगडे, प्रतीक कुंभार, आतिश नाईकनवरे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना (२०२६) अंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण (e-KYC) अभियान राज्यभर वेगाने सुरू असून, ३१ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत राज्यातील एकूण १६,९६,२०१ लाभार्थींपैकी ८,३३,२२३ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. ही प्रगती ४९.८४ टक्के इतकी आहे. विभागनिहाय आढाव्यानुसार अमरावती विभागात ५४.१५ टक्के, नाशिक विभागात ५४.९३ टक्के, पुणे विभागात ६०.२६ टक्के, कोल्हापूर विभागात ६४.२६ टक्के, नागपूर विभागात ४८.४८ टक्के, कोकण विभागात ४९.१५ टक्के, लातूर विभागात ३९.७७ टक्के, तर छत्रपती संभाजीनगर विभागात ३५.०६ टक्के आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे.

जिल्हानिहाय प्रगतीमध्ये अहमदनगर (७३.४७ टक्के), भंडारा (६९.८९ टक्के), वाशीम (६७.४८ टक्के), ठाणे (६७.४२ टक्के), सांगली (६७.३४ टक्के), सातारा (६६.५८ टक्के), पुणे (६५.४४ टक्के) आणि नाशिक (६४.८६ टक्के) या जिल्ह्यांनी उल्लेखनीय प्रगती नोंदविली आहे.

## शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्लेसमेंटमध्ये उत्कृष्ट यश

■ पुणे (दै. संध्या)

जेएसपीएमच्या राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाने (आरएससीओई), ताथवडे, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी उल्लेखनीय प्लेसमेंट निकाल मिळवून कॅम्पस प्लेसमेंटमधील आपले उत्कृष्टत्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. संस्थेने दर्जेदार शिक्षण, सखोल प्रशिक्षण आणि उद्योगांसोबतच्या मजबूत सहकार्याच्या माध्यमातून उद्योगासाठी तयार अभियंते घडवण्याची आपली परंपरा कायम ठेवली आहे. आरएससीओईच्या प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सेलने ४५० हून अधिक आघाडीच्या राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या सहभागाने कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राइव्ह यशस्वीरित्या आयोजित केले. विद्यार्थ्यांना ९५० हून अधिक प्लेसमेंट ऑफर्स मिळाल्या, ज्यापैकी ७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, कोअर इंजिनिअरिंग, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमेशन, कन्सल्टिंग आणि इमर्जिंग टेक्नॉलॉजी यांसारख्या विविध क्षेत्रातील नामांकित संस्थांमध्ये रोजगार मिळवला आहे. प्लेसमेंट सत्रादरम्यान देण्यात आलेले सर्वाधिक वेतन पॅकेज ₹ ३३ लाख प्रतिवर्ष आणि सरासरी पॅकेज ₹ ५.५ लाख प्रतिवर्षी पर्यंत पोहोचले, जे आरएससीओईच्या विद्यार्थ्यांची अपवादात्मक प्रतिभा आणि तांत्रिक क्षमता दर्शवते. टीसीएस, एक्सेंचर, कॅपजेमिनी, कॉग्निझंट, केपीआयटी, झेन्सार टेक्नॉलॉजी, क्विक हील, टेक महिंद्रा, इवायजिडीएस, क्नॉर ब्रेमसे, सुल्झर, डेटा एक्सल, पीटीसी सॉफ्टवेअर, क्विक हिल, रिलायन्स इंडस्ट्रीज, इन्फोसिस, नुटानिक्स, डासौल्ट सिस्टिम्स, किर्लोस्कर , डेलॉइट, स्टोरीज यांसारख्या अनेक नामांकित कंपन्या, आंतरराष्ट्रीय कंपन्या आणि इतर अनेक आघाडीच्या संस्थांनी भरती प्रक्रियेत भाग घेतला, आणि विविध अभियांत्रिकी शाखांमध्ये संधी उपलब्ध करून दिल्या. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनीरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड बिसिनेस सिस्टिम्स, ऑटोमेशन अँड रोबोटिक्स एमसीए, एमबीए आणि इतर अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना आकर्षक प्लेसमेंट ऑफर्स मिळाल्या.

## सूर्योदय पारधी समाज आदिवासी आश्रम शाळा क्रीडा संकुलाची उभारणी

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूज्य मोहन भागवत यांच्या हस्ते ८ ऑगस्ट रोजी उद्घाटन**

■ पुणे (दै. संध्या)




सामाजिक बांधिलकी जपत अमनोरा येस फाउंडेशनने बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील सूर्योदय पारधी समाज आदिवासी आश्रम शाळेचे पालकत्व स्वीकारून विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक क्रीडा संकुल आणि बंदिस्त प्रेक्षागृह उभारले आहे. या भव्य क्रीडा संकुलाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूज्य डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते ८ ऑगस्ट २०२६ रोजी होणार असल्याची माहिती अमनोरा येस फाउंडेशनचे अध्यक्ष तथा सिटी ग्रुपचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी विवेक कुलकर्णी उपस्थित होते.

या आश्रम शाळेची स्थापना परमपूज्य भय्यूजी महाराज यांनी केली होती. त्यानंतर अमनोरा येस फाउंडेशन यांनी २०१४ मध्ये शाळेची जबाबदारी स्वीकारली. विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला चालना मिळावी यासाठी फाउंडेशनने शाळेत व्हॉलीबॉल, हँडबॉल आणि बास्केटबॉलची स्वतंत्र मैदाने तसेच सुसज्ज बंदिस्त प्रेक्षागृह उभारले आहे. खामगाव येथील या आश्रम शाळेत सध्या पारधी समाजातील सुमारे ७५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच रोजगारक्षम कौशल्ये मिळावीत या उद्देशाने इलेक्ट्रिशियन, प्लंबिंग, मोटर मेकॅनिक आणि ब्युटी पार्लर या व्यावसायिक अभ्यासक्रमांचीही सुरुवात करण्यात आली आहे.

फाउंडेशनच्या ‘स्वयंसिद्ध’ उपक्रमांतर्गत जुन्या साड्यांपासून विद्यार्थिनींकडून आकर्षक कापडी पिशव्या तयार करून घेतल्या जातात. प्रत्येक पिशवीमागे विद्यार्थिनींना २५ रुपये मानधन दिले जाते. या उपक्रमातून प्रत्येक विद्यार्थिनीच्या खात्यात १० हजार रुपये जमा करण्यात आले असून, ही रक्कम ८ ऑगस्ट रोजी डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते विद्यार्थिनींना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती अनिरुद्ध देशपांडे यांनी दिली. अमनोरा येस फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवत आहे. ग्रामीण भागातील गरजू मुलींना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याबरोबरच अनेक विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणाला आर्थिक आधार देण्यात आला आहे.

या शिष्यवृत्तीमुळे रिक्षाचालकाची मुलगी डॉक्टर, अंगणवाडी सेविकेची मुलगी आयटी अभियंता, तर भाजी विक्रेत्याची मुलगी शासकीय अधिकारी बनल्याची उदाहरणे आहेत. तसेच नर्सिंगच्या ४० विद्यार्थिनींना ११ लाख रुपयांची ‘मीरा देशपांडे शिष्यवृत्ती’ देण्यात आली असून, ससून रुग्णालयातील मावश्या आणि ताईंना गेल्या आठ वर्षांपासून ‘मीरा देशपांडे सेवा सन्मान पुरस्कार’ प्रदान केला जात असल्याचेही देशपांडे यांनी सांगितले.

# बेकायदेशीर पिस्टल विक्रीसाठी आलेल्या टोळीचा पर्दाफाश

**तीन जण अटकेत : येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची मोठी कारवाई**

■ पुणे (दै. संध्या)




येरवडा पोलिसांनी बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या आणि देशी बनावटीचे पिस्टल विक्रीसाठी आणलेल्या तिघा जणांना अटक करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एक देशी बनावटीचे पिस्टल, एक जिवंत काडतूस आणि दुचाकीसह ९० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या दोघांविरुद्ध यापूर्वीही खूनाचा प्रयत्न, शस्त्र बाळगणे आणि संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील आणि पोलीस उपायुक्त चिलुमुला रजनीकांत यांनी शहरात अवैध शस्त्रधारकांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) केशव विंडे यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने ही कारवाई केली.

२८ जुलै रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास तपास पथक येरवडा परिसरात गस्त घालत असताना पोलीस अंमलदार बालाजी सोगे यांना गुप्त माहिती मिळाली. चव्हाण चौकातून मुळीक फार्मकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मोकळ्या जागेत तीन संशयित युवक देशी बनावटीचे पिस्टल घेऊन कोणाची तरी वाट पाहत असल्याची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड यांनी वरिष्ठांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी सापळा रचला. संशयित दुचाकीवरून पसार होण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्यांना शिताफीने पकडले. झडतीदरम्यान त्यांच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्टल आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. अटक करण्यात आलेल्यांची नावे महेश अशोक कांबळे (वय २१, भुगाव), गणेश तुळशीराम पवार (वय २२, नांदेड सिटी) आणि यश चंद्रकांत उरणकर (वय २२, पाषाण) अशी आहेत. चौकशीत महेश कांबळे याने जप्त केलेले पिस्टल विक्रीसाठी आणल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ४० हजार रुपयांचे देशी पिस्टल, ८०० रुपयांचे जिवंत काडतूस आणि ५० हजार रुपयांची दुचाकी असा एकूण ९० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तपासादरम्यान आरोपी महेश कांबळे याच्याविरुद्ध यापूर्वी नऱ्हे पोलीस ठाण्यात शस्त्र बाळगल्याचा गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले. तसेच आरोपी गणेश पवार याच्याविरुद्ध हवेली पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, मारहाण, बेकायदेशीर जमाव तसेच शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा नोंद असून, वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत (मोक्का) देखील गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

या आरोपींकडे शस्त्र कोठून आले, ते कोणाला विकले जाणार होते, तसेच त्यांच्या मागे आणखी कोणते गुन्हेगारी जाळे कार्यरत आहे का, याचा तपास येरवडा पोलिसांनी सुरू केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड करत आहेत. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने केली. पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड, मुकुंद कोकणे, बालाजी सोगे, शैलेश वाबळे, संदीप जायभाये, नटराज सुतार, गणेश पालवे, साईनाथ म्हस्के, अनिल मन्हाळकर आणि सोमनाथ गायकवाड यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## थोडक्यात पण महत्वाचे

### मडगाव कदंबा बसस्थानक खड्डेमय; टोल शुल्काची वसुली,

**मडगाव : दैनिक संध्या**

दक्षिण गोव्यातील प्रमुख परिवहन केंद्र असलेल्या मडगाव कदंबा बसस्थानकाची दुरवस्था झाल्याने बसचालक आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. स्थानकाच्या प्रवेशद्वारावरील खड्ड्यांमुळे बस चालविणे धोकादायक बनले आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नाही. परिणामी बसचे नुकसान होत असल्याची तक्रार चालकांनी केली आहे. डिझेलच्या वाढत्या किमती, प्रवाशांची घटलेली संख्या आणि वाहनांच्या देखभाल खर्चामुळे बस व्यावसायिक अगोदरच आर्थिक अडचणीत आहेत. त्यातच रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे दुरुस्तीचा अतिरिक्त खर्च वाढत आहे. स्थानकात पार्किंग व टोल शुल्क नियमितपणे आकारले जात असले तरी मूलभूत सुविधांचा अभाव असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. बस चालकांच्या म्हणण्यानुसार, कदंबा बसस्थानकात पार्किंग आणि टोल शुल्काची नियमित वसुली केली जाते. मात्र, त्याच्या बदल्यात सुरक्षित रस्ते किंवा मूलभूत सुविधा उपलब्ध होत नाहीत. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने बसचे वारंवार नुकसान होत असून, त्याचा आर्थिक फटका वाहतूक व्यावसायिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे खड्डे तातडीने बुजवून बसस्थानकातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी चालकांनी केली आहे. खासगी पर्यटक बस आणि नियमित मार्गावरील बसच्या अव्यवस्थित पार्किंगमुळे स्थानक परिसरात वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याचे चालकांचे म्हणणे आहे. मडगावप्रमाणेच काणकोण कदंबा बसस्थानकाचीही अवस्था दयनीय असून, दोन्ही ठिकाणी बस आत-बाहेर काढताना मोठी कसरत करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले. समस्या तातडीने सोडविली नाही तर आंदोलन छेडण्याचा इशाराही चालकांनी दिला आहे. दरम्यान, या प्रश्नाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम मंत्री दिगंबर कामत यांनी जनता दरबारात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (रस्ते) अभियंत्यांना कदंब महामंडळाशी समन्वय साधून बसस्थानकातील खड्डे तातडीने बुजवण्याचे निर्देश दिले आहेत. कदंबा बसस्थानक कदंब महामंडळाच्या अखत्यारीत असल्याने दुरुस्तीची जबाबदारी महामंडळाची असून, हे काम त्वरित पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### दहा हजारांपेक्षा कमी शुल्कात घरे नावावर होणार:

**वास्को : दैनिक संध्या**

नवेवाडे हाऊसिंग बोर्ड वसाहतीतील १२० घरे पंचायत मंत्री तथा दाबोळीचे आमदार माविन गुदिन्हो यांच्या पुढाकारामुळेच कुटूंबांच्या नावावर होत आहेत. गोवा गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीतील उर्वरीत ४२४ घरे पुढील चार महिन्यात नावावर होतील. याची कागदपत्रे देण्यासाठी गृहनिर्माण मंडळाच्या पर्वरी कार्यालयात जाण्याची गरज नाही. अधिकारी नवेवाडे येथे मंत्री गुदिन्हो यांच्या कार्यालयात येऊन सर्व सोपस्कार पूर्ण करतील. यासाठी लागणारे शुल्क १० हजारांहूपेक्षा कमी असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केली. मुख्यमंत्री म्हणाले की, चाळीस वर्षापूर्वी तत्कालीन सरकारने या कुटूंबीयांची तेथील घरे पाडून त्यांना नवेवाडे हाऊसिंग बोर्ड वसाहतीत ३०, ५०, ७० आणि १०० चौरस मीटरच्या घरांत स्थलांतरीत केले. यापैकी अनेकांनी गोवा गृहनिर्माण मंडळाला त्यावेळी सुमारे ५ हजारांचा महसूलही भरला. गेली अनेक वर्षे ही कुटुंबे मुरगाव पालिकेला घरपट्टी, वीज, पाणी बिल भरतात. गुदिन्हो यांनी ही घरे संबंधितांच्या नावावर व्हावी यासाठी प्रयत्न केले.' चेअरमन जीत आरोलकर यांनी मंत्री गुदिन्हो यांनी घेतलेल्या पुढाकारामुळेच ही घरे लोकांच्या नावावर झाल्याचे सांगितले. उर्वरीत घरे येत्या काही महिन्यात संबंधितांच्या नावावर होतील असे सांगितले. मंत्री माविन गुदिन्हो म्हणाले की, 'ही घरे त्या त्या कुटूंबांच्या नावावर व्हावीत यासाठी बरीच वर्षे प्रयत्न केले. आज ती स्वप्नपूर्ती होत आहे. त्यासाठी मी मुख्यमंत्री सावंत आणि गृहनिर्माण मंडळाचे चेअरमन जीत आरोलकर यांचे आभारी आहे. भाजप सरकारने गरीब कुटुंबांच्या उत्थानासाठी योग्य पावले उचलली आहेत. घरे त्यांच्या नावावर होत असल्याची बाब आनंदाची आहे. दाबोळी मतदारसंघात अनेक प्रकल्पांमुळे मोठा विकास झाला आहे. भाजप सरकार आणि मुख्यमंत्र्यांच्या पाठिंब्यामुळेच हे शक्य झाले. काल, गुरुवारी नवेवाडे येथे आयोजित खास कार्यक्रमात १२० कुटुंबीयांना मालकी पत्रे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी हाऊसिंग बोर्डात गोमंतकीय कुटूंबे असून आम्ही कोणातच भेदभाव न करता त्यांची घरे नावावर करण्यासाठी पुढाकार घेतला आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. व्यासपीठावर मंत्री गुदिन्हो, गोवा गृहनिर्माण मंडळाचे चेअरमन तथा आमदार जीत आरोलकर, बोगमाळोचे सरपंच संकल्प महाले, चिखलीचे सरपंच कमलाप्रसाद यादव, उपसरपंच ऐश्वर्या कोरगावकर, मुरगावचे मुख्याधिकारी सिद्धीविनायक नाईक, मुरगावचे माजी नगरसेवक सुदेश भोसले उपस्थित होते. माझे घर योजनेंतर्गत १० हजार कुटूंबांची घरे नावावर करण्याची प्रमाणपत्रे तयार झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्री म्हणाले की, 'विरोधकांनी माझे घर योजना आणि हाऊसिंग बोर्डातील कुटूंबांची घरे नावावर होत असताना खोटे आरोप करण्यास सुरवात केली. मात्र आमच्या सरकारने भेदभाव न करता लोकहिताचे काम केले. विरोधक त्यांच्या सत्तेच्या कार्यकाळात काहीच करु शकले नाहीत. आता ते समाजात फूट पाडण्यासाठी धर्म, जातीबाबत विषय पुढे करून राजकारण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. माविन यांनी दाबोळीत अभूतपूर्व विकास केला आहे. लोकांची घरे त्यांच्या नावावर व्हावी यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे जनता त्यांच्याबरोबरच उभी राहील.' मंत्री गुदिन्हो म्हणाले की, 'निवडणुका जवळ आल्या की अनेकजण दाबोळी विमानतळ बंद पडणार, अशा अफवा पसरवितात. त्या विषयात मी मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्याशी चर्चा केली आहे. हे विमानतळ कधीच बंद पडणार नाही, असे आश्वासन त्यांनी पूर्वीच दिले आहे. मोपा आणि दाबोळी दोन्ही विमानतळ कायमस्वरुपी चालतील.

### बहिणीने प्रेमविवाह केला, भावाने भाऊजीच्या डोक्यातच घातला दगड

**जामनेर: दैनिक संध्या**



बहिणीने प्रेमविवाह केल्याच्या रागातून मेहुण्याला जंगलात नेऊन त्याच्या डोक्यात दगड घालून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. ही धक्कादायक घटना तोरनाळे (ता. जामनेर) शिवारात २७ जुलै रोजी सायंकाळी घडली. यात संशयिताला अन्वा (ता. सिल्लोड) येथून अटक करण्यात आली आहे. प्रशांत सुभाष चौधरी (२६, रा. सुभाषपुरा, फत्तेपूर ता. जामनेर) याने वडगाव सद्दो येथील तरुणीशी प्रेमविवाह केला होता. या लग्नाला तरुणीचा भाऊ अभिषेक संतोष मोरे (वय १९) याचा विरोध होता. या लग्नाबद्दल अभिषेकच्या मनात प्रशांतबद्दल राग होता. २७ जुलै रोजी अभिषेकने प्रशांतला त्याच्याच दुचाकीवर बसवले आणि तोरनाल्याच्या जंगलात नेले तेथे दोघांमध्ये जोरदार वाद झाला. त्याचवेळी अभिषेकने प्रशांतच्या डोक्यात मोठा दगड घातला. प्रशांत रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतर तो मृत झाल्याचे समजून अभिषेकने त्याच्या अंगावर झाडाच्या फांद्या आणि पालापाचोळा टाकला व त्याचीच दुचाकी घेऊन तेथून पळ काढला. गंभीर जखमी झालेल्या प्रशांतवर सध्या जळगावच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. याप्रकरणी फत्तेपूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार प्रवीण चौधरी, गनी तडवी, मुकेश पाटील आणि चेतन तांगडे यांच्या पथकाने अन्वी येथून संशयिताला ताब्यात घेतले.

# महाराष्ट्रात पावसाचा धुमाकूळ



■ **पुणे: (दै. संध्या)**

महाराष्ट्रात पावसाने जोरदार हजेरी लावली असून अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू आहे. पुणे शहर आणि जिल्ह्यातही गुरुवारी रात्रीपासून संततधार पाऊस सुरू असल्याने धरणांच्यापाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली आहे. खडकवासला धरण शंभर टक्के भरले असून पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शुक्रवारी (३१ जुलै) सकाळी धरणातून मुठा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढविण्यात येणार आहे. याचबरोबर पानशेत धरणातूनही सांडव्यावरील विसर्ग वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

शुक्रवारी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार खडकवासला धरणात १.९७ टीएमसी म्हणजेच १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १७ मिमी पावसाची नोंद झाली असून धरणात २६३ एमसीएफटी येवा सुरू आहे. आतापर्यंत धरणाच्या सांडव्यावरून एकूण ४.०९ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.

खडकवासला पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, धरणातील पाण्याची पातळी वेगाने वाढत असल्याने आज (३१ जुलै) सकाळी १०.३० वाजता सांडव्यावरील विसर्ग ७,९२५ क्युसेक्सने वाढवून एकूण १६,२४७ क्युसेक्स करण्यात येणार आहे. पावसाच्या प्रमाणानुसार आणि धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकानुसार हा विसर्ग पुन्हा कमी किंवा वाढविण्याची शक्यता असल्याचेही विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, पानशेत धरणातही पाणीसाठा झपाट्याने वाढत असून सकाळी ६ वाजेपर्यंत धरणात १०.४७ टीएमसी म्हणजे ९८.३८ टक्के पाणीसाठा झाला आहे. धरणाच्या परिसरात २६ मिमी पावसाची नोंद झाली असून धरणात २०० एमसीएफटी पाण्याची आवक सुरू आहे. जलविद्युत गृहातून ६०० क्युसेक्स विसर्ग सुरू असून सकाळी १० वाजता सांडव्यावरील ३,१९६ क्युसेक्स विसर्ग वाढवून ४,९७५ क्युसेक्स करण्यात येणार असल्याची सूचना प्रशासनाने दिली आहे.

वारसगाव धरणात १२.२१ टीएमसी म्हणजे ९५.२८ टक्के पाणीसाठा असून धरणात २५८ एमसीएफटी येवा सुरू आहे. तर टेमघर धरणात ३.०९ टीएमसी म्हणजे ८३.३६ टक्के पाणीसाठा झाला असून ६२ एमसीएफटी पाण्याची आवक सुरू आहे.


खडकवासला धरण समूहातील चारही धरणांमध्ये मिळून २७.७६ टीएमसी म्हणजेच ९५.२२ टक्के पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा २५.४८ टीएमसी (८७.४१ टक्के) इतका होता. सध्या चारही धरणांमध्ये मिळून ७८३ एमसीएफटी पाण्याची आवक सुरू असल्याने धरणांतील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, प्रशासनाने मुठा नदीकाठच्या नागरिकांना विशेष सतर्कतेचा इशारा दिला आहे. नदीपात्रात उतरू नये, नदीकाठावरील पंप, शेतीची अवजारे, जनावरे तसेच इतर साहित्य तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावे, तसेच सखल भागातील नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन खडकवासला पाटबंधारे विभागाने केले आहे.

## हंगामा ओटीटीने सादर केली 'सर्व्हिस गर्ल': एआयच्या गैरवापराचा धक्कादायक चेहरा उघड करणारी थरारक क्राईम ड्रामा मालिका

■ **मुंबई (दै. संध्या)**

हंगामा ओटीटी ने नुकतीच आपली नवीन ओरिजिनल मालिका 'सर्व्हिस गर्ल' प्रदर्शित केली आहे. ही एक थरारक क्राईम ड्रामा मालिका असून, यात एआयच्या मदतीने तयार केले जाणारे डीपफेक व्हिडिओ आणि ऑनलाइन ओळखीच्या चोरीमुळे होणारे गंभीर परिणाम दाखवण्यात आले आहेत. डिजिटल युगातील वाढत्या सायबर धोक्यांवर प्रकाश टाकणारी ही मालिका दाखवते की एआयचा चुकीचा वापर केल्यास एखाद्या व्यक्तीचे आयुष्य, प्रतिष्ठा आणि नातेसंबंधांवर किती मोठा परिणाम होऊ शकतो. दिव्या ही या कथेची मुख्य व्यक्तिरेखा आहे. ती एका छोट्या शहरात राहणारी तरुणी आहे, जिथे आजही अनेक लोकांचे विचार पारंपरिक आहेत. तिच्या चेहऱ्याचा वापर करून तयार करण्यात आलेला एक अश्लील एआय डीपफेक व्हिडिओ व्हायरल होतो आणि तिचे संपूर्ण आयुष्य बदलून जाते. एका रात्रीत तिचे लग्न, तिची प्रतिष्ठा आणि जवळच्या लोकांचा विश्वास ती गमावते. सायबर गुन्ह्याची शिकार होण्यासोबतच तिला समाजाच्या चुकीच्या




निर्णयांचाही सामना करावा लागतो. लाज आणि समाजाच्या दबावाला बळी न पडता, दिव्या त्या खोट्या व्हिडिओमागचे सत्य शोधण्याचा निर्धार करते. तपास करताना तिला एक मोठे सायबर गुन्हेगारी जाळे सापडते, जे बनावट ओळखींचा वापर करून महिलांचे शोषण करते आणि त्यांच्याकडून पैसे उकळते. स्वतःवरील आरोप दूर करण्यासाठी सुरू केलेला तिचा संघर्ष पुढे डिजिटल अत्याचाराचे वास्तव जगासमोर आणण्याच्या लढाईत बदलतो. ही मालिका दाखवते की एआय तंत्रज्ञान खूप उपयुक्त असले तरी, त्याचा गैरवापर झाल्यास तेच तंत्रज्ञान एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकते. कथेतील आणखी एक महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे कंगना. ही भूमिका मल्लोबिका बॅनर्जीने साकारली आहे. कंगना ही एक धाडसी आणि महत्त्वाकांक्षी मॉडेल असून तिचे अभिनेत्री बनण्याचे स्वप्न आहे. निर्भय आणि जिद्दी असलेली कंगना मुंबईत दिव्याला भेटते आणि तिचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या सायबर गुन्हेगारी जाळ्याचा पर्दाफाश करण्यासाठी मजबूत साथ देते. तपास पुढे जात असताना, कंगनाचे धैर्य आणि जिद्द सत्य समोर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना मल्लोबिका बॅनर्जी म्हणाल्या, "कंगना ही धाडसी, निडर आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी मुलगी आहे. तिचे अभिनेत्री म्हणून मोठे यश मिळवण्याचे स्वप्न आहे. पण दिव्याची भेट झाल्यानंतर तिच्या आयुष्याला एक नवीन दिशा मिळते. सायबर गुन्ह्यामागील सत्य बाहेर आणण्यासाठी ती दिव्याला मदत करण्याचा निर्धार करते. 'सर्व्हिस गर्ल' या मालिकेतील मला सर्वात आवडणारी गोष्ट म्हणजे, यात इंटरनेटची अशी लपलेली बाजू दाखवण्यात आली आहे जी खऱ्या आयुष्यातही अस्तित्वात आहे.

## एचडीएफसी बँकेच्या सीएसआरचे अस्तित्व पोहोचले १०.७७ कोटी लोकांपर्यत

■ **मुंबई (दै. संध्या)**

एचडीएफसी बँक या भारतातील खाजगी क्षेत्रातील सर्वांत मोठ्या बँकेच्या सीएसआर उपक्रमामुळे १०.७७ कोटी लोकांवर परिणाम झाला आहे. परिवर्तन हा त्यांचा सीएसआर उपक्रमांचा ब्रॅन्ड असून हा ब्रॅन्ड आता भारतातील २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये पोहोचला आहे. बँक सध्या एनजीओ पार्टनर्स, स्थानिक प्रशासन आणि सामाजिक संस्था बरोबर काम करुन स्थानिक स्तरावरील गरजेच्या, दीर्घकालीन शाश्वत परिणाम घडवण्यासाठी योग्य पध्दतीने सहकार्य करत आहे. बँके तर्फे ही घोषणा करण्यात आली की त्यांच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) उपक्रमा अंतर्गत त्यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु १,३१६.१८ कोटी रुपये खर्च केले असून याची घोषणा या वर्षीच्या एकत्रित वार्षिक अहवालात त्यांनी केली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ रु २४८ कोटींची असून सर्वसमावेशक सीएसआर मधील गुंतवणूक त्यांच्या परिवर्तन या कार्यक्रमाच्या सुरुवातीपासून त्यांनी अंदाजे ७,४९२ कोटी रुपयांची आहे. बँकेच्या होलिस्टिक रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम (एचआरडीपी) ची प्रगती होऊन वर्षभरापूर्वी १०,४३० गावां वरुन देशातील ११००० गावांमध्ये पोहोच गेली आहे. जल-व्यवस्थापन, कृषी, उपजीविका, शिक्षण, आरोग्यसेवा, स्वच्छता आणि सामुदायिक पायाभूत सुविधा यांचा समावेश असलेल्या एकात्मिक दृष्टिकोनाद्वारे, हा कार्यक्रम ग्रामीण भागांना अधिक बळकट करण्यासोबतच लोकांचे जीवनमान सुधारण्याचे कार्य अविरतपणे करत आहे. या कार्यक्रमाच्या कार्यक्षेत्रात ग्रामीण विद्युतीकरण, उपजीविकेतील सुधारणा आणि कृषी, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास यांसारख्या बाबींचा समावेश आहे.

## पुण्यात धोक्याची घंटा!

■ **पुणे (दै. संध्या)**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीत मोठा विसर्ग सुरू केल्याने एकतानगर परिसरात निर्माण झालेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने तातडीने बचावकार्य राबविले. जलपूजन, शारदा, द्वारका आणि आनंद पार्क या सोसायट्यांमधील सुमारे ४० कुटुंबांतील सुमारे १०० नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले. या नागरिकांची जवळच्या बॅडमिंटन हॉलमधील निवारा केंद्रात तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन

**आदिवासी विकास विभाग आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

http://trti.maharashtra.gov.in

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI), पुणे, यांचेमार्फत १० आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवनावर आधारित लघुपट निर्मिती करण्यासाठी संस्थेची निवड करणेबाबत....**

अनुसूचित जमातीतील क्रांतिकारकांच्या जीवनावर आधारित लघुपट निर्मिती करुन आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांचे अलौकिक कार्य नव्या पिढीसमोर आणणे, त्यांच्या संघर्षाचा इतिहास डिजिटल स्वरूपात जतन करणे, सांस्कृतिक वारसा वृद्धिंगत करणे आणि त्यांच्या बलिदानाचा योग्य सन्मान करणे करिता अनुभवी सेवापुरवठादार संस्थेची निवड ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येणार आहे.

त्यानुसार निविदासंच, सेवापुरवठादार संस्थेची अर्हता व पात्रताबाबतचे निकष इ. व तत्सम महितीकरीता अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in ला भेट द्यावी. अर्हता प्राप्त सेवापुरवठादार संस्थांनी आपले प्रस्ताव ऑनलाईन सादर करावेत. अधिक माहितीकरीता या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ http://trti.maharashtra.gov.in ला भेट द्यावी.

अर्हतेनुसार पात्र सेवापुरवठादार संस्थेचे निवड करण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १७/०८/२६ रोजी वेळ १७.०० वाजेपर्यंत राहील.

सही/-
(निलेश सागर, भा.प्र.से)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

विमाका-पुणे-जाहि-१०४-२०२५-२६

**ग्रामपंचायत पिलाणवाडी, ता. दौंड, जि.पुणे**

**B1 पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२६/२७**

ग्रामपंचायत पिलाणवाडी, ता. दौंड, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत पिलाणवाडी ता. दौंड जि.पुणे यांच्याकडुन दिनांक ३१/०७/२०२६ ते दिनांक ०७/०८/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक ३१/०७/२०२६ ते दिनांक ०७/०८/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिलाणवाडी ग्रामपंचायत कार्यालय येथे फर्निचर करणे. | २९९९९१/- | दिनांक ३१/०७/२०२६ ते दिनांक ०७/०८/२०२६ | २३६/- | ३०००/- |
| २ | पिलाणवाडी ग्रामपंचायत कार्यालय येथे सुधारणा (फर्निचर) करणे. | ४९९९९३/- | | ५९०/- | ५०००/- |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत पिलाणवाडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा राहु खाते क्र. ०५२००२५०००००१४१ वर भरल्याची पावती/चलन दिल्या नंतर उपलब्ध होतील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत पिलाणवाडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा राहु खाते क्र. ०५२००२५०००००१४१ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत पिलाणवाडी यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत पिलाणवाडी ता. दौंड जि. पुणे



## थोडक्यात पण महत्वाचे

### घरफोडीसाठी वाहनचोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना चिखली पोलिसांकडून अटक

**पिंपरी : दैनिक संध्या**

घरफोडी करण्यासाठी वाहनांची चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना चिखली पोलिसांच्या डी.बी. पथकाने अटक करून वाहनचोरीचे पाच गुन्हे उघडकीस आणले आहेत. आरोपींकडून चार मोटारसायकली आणि एक ऑटो रिक्षा असा एकूण २ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढत्या वाहनचोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर डी.बी. पथकाने विशेष तपास मोहीम हाती घेतली होती. तपासादरम्यान पोलिसांनी सुमारे १५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली. तसेच बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे राज संतोष बापर्डेकर (वय २३, ताम्हाणे वस्ती, चिखली) आणि शंकरसिंग समंदरसिंग टाक (वय १८, गाडीतळ, हडपसर) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसी चौकशीत आरोपींनी वाहनचोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्यांच्याकडून चोरीच्या चार मोटारसायकली आणि एक ऑटो रिक्षा हस्तगत करण्यात आली. या कारवाईमुळे चिखली पोलीस ठाण्यात दाखल असलेले वाहनचोरीचे पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. तपासात अटक आरोपी राज बापर्डेकर हा पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले असून त्याच्यावर यापूर्वी १२ गुन्हे दाखल आहेत. तर शंकरसिंग टाक याच्यावर हडपसर, येरवडा आणि निगडी पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून तो अनेक प्रकरणांमध्ये वॉन्टेड होता. ही कारवाई चिखली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित जाधव यांच्या नेतृत्वाखाली डी.बी. पथकाचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) अमोल फडतरे, सहायक पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण तसेच पोलीस हवालदार किरण काटकर, विनोद व्होनमाने, प्रविण भोमाळे, सुरज सुतार, अरुण साबळे, भरत माने, संतोष भालेराव, अजय गायकवाड, कंठय्या स्वामी, रोहीत मोरे, पोलीस शिपाई अनिल राक्षे व संतोष भोर यांनी यशस्वी रित्या पार पाडली आहे. या कारवाईमुळे वाहनचोरी व घरफोडीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असून चिखली पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

### ताथवडे अत्याचार प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन

**पिंपरी : दैनिक संध्या**

वाकड-ताथवडे परिसरातील अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणाचा तपास अधिक प्रभावी आणि वेगाने पूर्ण करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. या पथकाची धुरा सहाय्यक पोलीस आयुक्त (एसीपी) सुनील कुऱ्हाडे यांच्याकडे सोपविण्यात आली असून, पथकात पाच अधिकारी आणि पाच कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या प्रकरणातील सर्व पुरावे, साक्षीदारांचे जबाब, तांत्रिक माहिती आणि इतर महत्त्वाच्या बाबींची सखोल पडताळणी करण्याचे काम एसआयटीमार्फत केले जाणार आहे. तपास पूर्ण करून लवकरात लवकर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याच्या दृष्टीने पोलिसांकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या प्रकरणातील आरोपीला न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान आरोपीकडून अधिक माहिती मिळविण्यासाठी आणि गुन्ह्याशी संबंधित सर्व बाबींचा उलगडा करण्यासाठी पोलिसांकडून कसून चौकशी केली जात आहे. पीडितेला जलद आणि योग्य न्याय मिळावा, यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असून तपासात कोणतीही हयगय केली जाणार नसल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. या संवेदनशील प्रकरणामुळे परिसरात संतापाची भावना व्यक्त होत असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### भर दुपारी पुन्हा रस्त्यावर धावणार आरएमसी मिक्सर

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासोबतच बांधकाम क्षेत्राला दिलासा देण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) मिक्सर वाहनांना प्रवेशबंदीच्या वेळेत अंशतः सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. आरएमसी असोसिएशनसोबत झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला असून, दि.२९ जुलैपासून पुढील एक महिन्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. त्यानुसार सोमवार ते शुक्रवार सकाळी ११ ते सायंकाळी ५ या कालावधीत आरएमसी मिक्सर वाहनांना शहरातील प्रवेशबंदीतून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे बांधकाम प्रकल्पांना आवश्यक असलेल्या काँक्रीटच्या वाहतुकीला गती मिळणार आहे. मात्र, सकाळ आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत ही प्रवेशबंदी कायम राहणार आहे. तसेच शनिवार आणि रविवारी सायंकाळी ४ ते रात्री ९ या वेळेतही आरएमसी वाहनांना शहरात प्रवेश दिला जाणार नाही. या सवलतीसोबत काही महत्त्वाच्या सुरक्षा अटीही घालण्यात आल्या आहेत. प्रत्येक आरएमसी वाहनावर ३६० अंश कॅमेरा बसवणे अथवा क्लिनर ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच चालकांची डीडी (Drunken Drive) मशीनद्वारे नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, ही सवलत केवळ आरएमसी मिक्सर वाहनांसाठी लागू असून डंपर, हायवा आणि इतर अवजड वाहनांना त्याचा लाभ मिळणार नाही. सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे. वाहतूक व्यवस्थापन आणि बांधकाम क्षेत्रातील गरजा यांचा समतोल साधण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, पुढील महिनाभरातील अनुभवाच्या आधारे याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली आहे.

### कासारवाडी रेल्वे क्रॉसिंग फाटक बंद करण्याच्या निर्णयाला तीव्र विरोध;

**पिंपरी : दैनिक संध्या**

कासारवाडी येथील रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक ६९ कायमस्वरूपी बंद करण्याच्या प्रस्तावाला स्थानिक नागरिकांकडून विरोध होत असून, या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी नगरसेविका मनीषा श्याम लांडे यांनी खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मनीषा लांडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, कासारवाडी गाव रेल्वे मार्गामुळे पूर्व आणि पश्चिम अशा दोन भागांत विभागले गेले आहे. रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक ६९ हे दोन्ही भागांना जोडणारे महत्त्वाचे दुव्याचे काम करत आहे. हे फाटक कायमस्वरूपी बंद झाल्यास हजारो नागरिकांना दैनंदिन प्रवासात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागेल. कासारवाडी पश्चिम भागातील अनेक विद्यार्थी पूर्व भागातील शाळांमध्ये शिक्षण घेतात. फाटक बंद झाल्यास विद्यार्थ्यांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागेल, ज्याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच गणेशोत्सव, शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, गुढीपाडवा, बसवराज महाराज मिरवणूक, ईद-ए-मिलाद तसेच श्री भैरवनाथ यात्रा आणि पालखी सोहळा यांसारख्या विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांसाठी या फाटकाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. फाटक बंद झाल्यास या पारंपरिक कार्यक्रमांच्या आयोजनात गंभीर अडचणी निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय अंत्ययात्रा, आपत्कालीन परिस्थितीतील अग्निशमन दल, रुग्णवाहिका, पोलीस व इतर अत्यावश्यक सेवांसाठीही हा मार्ग महत्त्वाचा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## 'साहित्यरत्न दौड २०२६' पिंपरी-चिंचवडमध्ये

■ पिंपरी (दै. संध्या)



साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या समतावादी, परिवर्तनवादी व लोकजागृतीच्या विचारांचा व्यापक प्रसार व्हावा, तसेच युवकांमध्ये आरोग्य, सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी, याच उद्देशाने मा. आमदार श्री. अमित गोरखे यांच्या मुख्य संकल्पनेतून महाराष्ट्रातील पहिली आगळीवेगळी 'साहित्यरत्न दौड २०२६' भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे पिंपरी-चिंचवड प्रबोधन पर्व २०२६' या साप्ताहिकाअंतर्गत विविध कार्यक्रम होत असून, याच उपक्रमाचा एक भाग म्हणून ही भव्य 'साहित्यरत्न दौड' आयोजित करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रबोधन पर्व २०२६ अंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशन, आर्टी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि कलारंग यांच्या संयुक्त विद्यमाने हा आगळावेगळा उपक्रम २ ऑगस्ट रोजी पार पडत आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे आणि देशाचे अभिमानास्पद साहित्यरत्न, लोकशाहीर आणि सामाजिक परिवर्तचे प्रणेते होते. त्यांनी आपल्या अजरामर साहित्य, शाहिरी आणि क्रांतिकारी कार्यातून वंचित, शोषित, कष्टकरी व बहुजन समाजाला स्वाभिमान, संघर्ष आणि सामाजिक न्यायाची प्रखर प्रेरणा दिली. त्यांचे विचार आजही संपूर्ण बहुजन समाजासाठी दीपमाळ ठरले आहेत. त्यांच्या याच वैचारिक वारशाला अभिवादन करण्यासाठी आमदार अमित गोरखे यांच्या पुढाकाराने आयोजित ही दौड केवळ एक क्रीडा स्पर्धा नसून सामाजिक समरसता, आरोग्यदायी जीवनशैली आणि युवकांच्या सहभागाचा एक मोठा संदेश देणारा सामाजिक उत्सव आहे. प्रस्तावित मार्ग: बर्ड व्हॅली उद्यान चौक (नोव्हर चौक) निगडी-भोसरी रोड केएसबी चौक पिंपरी-चिखली रोडकडे उजवे वळण पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त निवासस्थान लाल बहादूर शास्त्री मार्ग (बीआरटी) कडे उजवे वळण कालेवाडी बीआरटी कॉरिडोअर मदर तेरेसा उड्डाणपूल पवना नदी पूल जोतिबा गार्डन, पवनानगर बस स्टॉप (येथून यु-टर्न) याच बीआरटी मार्गाने माघारी समाप्ती: बर्ड व्हॅली उद्यान चौक. युवकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे विचार घराघरांपर्यंत पोहोचावेत, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. आमदार अमित गोरखे यूथ फाऊंडेशनच्या माध्यमातून आयोजित हा महाराष्ट्रातील पहिलाच आगळावेगळा उपक्रम आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आणि पिंपरी-चिंचवडच्या क्रीडा व सांस्कृतिक चळवळीत इतिहास घडवण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी, माता-भगिनींनी आणि युवकांनी या भव्य 'साहित्यरत्न दौड २०२६' मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मा. आमदार श्री. अमित गोरखे यांनी केले आहे.

## पाणी सुरक्षिततेसाठी नवीन पंप हाऊस आणि पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाला गती द्या..

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, वाढता नागरी विस्तार आणि भविष्यातील पाणी गरजा लक्षात घेता पिंपरी-चिंचवडसाठी दीर्घकालीन व शाश्वत पाणी नियोजन करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी आयुक्तांना निवेदन सादर केले.

निवेदनात रावेत येथील विद्यमान पंप हाऊस प्रकल्पाच्या धर्तीवर शहरासाठी आणखी एक आधुनिक पाणी उपसा प्रकल्प, पंपिंग स्टेशन आणि आवश्यक जलवाहिनी व्यवस्था उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी तांत्रिक व्यवहार्यता अहवाल तयार करून भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी नवीन पाणी स्रोतांचा शोध घेण्याची आणि त्याचे नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. तसेच शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा पवना बंद जलवाहिनी प्रकल्प अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, तो तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय, तांत्रिक आणि आर्थिक प्रक्रिया वेगाने पूर्ण कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास पाणीगळती मोठ्या प्रमाणात कमी होईल, पवना धरणातील उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर करता येईल आणि शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला दीर्घकालीन सुरक्षितता मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

## गुरुपौर्णिमा महोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न..

■ पिंपरी (दै. संध्या)

कासारवाडी-पिंपळे गुरव येथील श्री दत्त साई सेवा कुंज आश्रमात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम बुधवारी भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाले. त्यानंतर गायक विशालजी रसाळ यांनी सादर केलेल्या भक्तिमय संगीत कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांनी सादर केलेल्या सुमधुर भक्तिगीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मरणार्थ राबविण्यात आलेल्या 'आरोग्य वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमातील सहभागी डॉक्टर, वारकऱ्यांची चरणसेवा करणारे चरण सेवा करणाऱ्या सेवेकाऱ्यांचा यावेळी आमदार शंकर जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विशेष सन्मान करण्यात आला. या सोहळ्यास गोसेवक, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विजू शेठ जगताप, जगद्गुरू कृपांकित डॉ. ह.भ.प. चैतनानंदजी महाराज पुणेकर यांच्यासह प्रशासक, त्रिवेणी आश्रम, आर्ट ऑफ लिव्हिंग ब्रह्मचारी माधवानंदजी, शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सांगवीचे डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा रुग्णालय रुग्ण कल्याण समिती सदस्य डॉ. देविदास शेलार, दादा वेदपाठक, स्टेट टीचर, आर्ट ऑफ लिविंग वसंत सानप, ह.भ.प. शेखर महाराज जांभुळकर, स्टेट टीचर समन्वयक, आर्ट ऑफ लिविंग माणिक भोंग, तुषार आल्हाट, सुरज आंग्रे, डॉ दिलीप सातव, डॉ दीपक खोडवे मुकुंदराव गुरव, गोरक्षक राजकुमार चौगुले, विनोद बंसल, एम.डी. डायबेटोलॉजिस्ट चंद्रकांत कणसे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी गुरुपौर्णिमेचे आध्यात्मिक महत्त्व विशद करतानाच आश्रमाच्या धार्मिक आणि सामाजिक कार्याचे कौतुक केले.

## जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभाग, कॅरम असोसिएशन ऑफ पुणे आणि नवरात्र मित्र मंडळ, इंद्रायणीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कै. सोपानराव भोईर यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या १९ व्या महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा २०२५-२६ चा शुभारंभ आज पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.

चिंचवड येथील कै. मनिषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, सावरकर उद्यानाशेजारी आयोजित या स्पर्धेत पुरुष, महिला आणि ज्येष्ठ नागरिक गटातील खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. दि. २९ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ४०० हून अधिक कॅरमपटू आपल्या कौशल्याची चुरस दाखविणार आहेत. कॅरमसारख्या बौद्धिक, कौशल्याधारित आणि एकाग्रतेची कसोटी पाहणाऱ्या खेळाला प्रोत्साहन देणे, नवोदित खेळाडूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि शहरात क्रीडा संस्कृती अधिक बळकट करणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे. स्पर्धेतील विविध गटांतील विजेत्या खेळाडूंना एकूण ₹३.५६ लाखांची रोख पारितोषिके तसेच आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा विभागाचे उपायुक्त पंकज पाटील तसेच जिल्हाभरातील खेळाडू, क्रीडाप्रेमी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले, "कॅरम हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसून एकाग्रता, संयम, अचूकता आणि निर्णयक्षमता विकसित करणारा खेळ आहे. महापौर चषक कॅरम स्पर्धेच्या माध्यमातून शहरातील आणि जिल्ह्यातील खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्याची मोठी संधी उपलब्ध होत आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये वाहनचालक हैराण

■ पिंपरी (दै. संध्या)



शहरात पावसाने काही दिवसांपासून उघडीप दिली असली तरी मध्यवर्ती भागासह प्रमुख रस्त्यांवरील खड्डे अद्याप कायम असल्याने वाहनचालक आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील एकूण १,४४४ खड्ड्यांपैकी ९२८ खड्डे बुजविण्यात आल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्ष परिस्थिती याउलट असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरातील अनेक प्रमुख मार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्डे असून त्यांची संख्या पालिकेच्या आकडेवारीपेक्षा कितीतरी अधिक असल्याचा आरोप होत आहे.

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे दररोज हजारो वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वारांना विशेषतः मोठा त्रास सहन करावा लागत असून किरकोळ अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे खड्डे तातडीने बुजवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

विशेषतः जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील नाशिक फाटा ते वल्लभनगर या दरम्यानच्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. या मार्गावरील मोठमोठे खड्डे मेट्रोच्या कामामुळे पडल्याचा आरोप

स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. मात्र, मेट्रो प्रशासन यासाठी महापालिकेला जबाबदार धरत असून महापालिकेकडूनही ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दरम्यान, रस्ते बांधकामानंतर काही वर्षे त्यांच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी संबंधित कंत्राटदारांवर असते.

मात्र, अनेक ठिकाणी कंत्राटदारांकडून ही जबाबदारी पार पाडली जात नसल्याचे दिसून येत आहे. त्याऐवजी महापालिकेकडून इतर ठेकेदारांच्या माध्यमातून डांबर, कोल्ड मिक्स, पेव्हिंग ब्लॉक, बीबीएम आणि काँक्रिटचा वापर करून तात्पुरती डागडुजी केली जात आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेपेक्षा मानवी बुद्धिमत्तेचे महत्त्व कायम

■ पुणे (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) झपाट्याने विकसित होत असली तरी मानवी भावना, वर्तन आणि मानसिक आरोग्य समजून घेण्यासाठी मानवी बुद्धिमत्तेचे महत्त्व भविष्यातही कायम राहणार असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. मानसिक आरोग्याबाबत वाढती जागरूकता आणि प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांची वाढती गरज लक्षात घेऊन ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठाच्या (डीपीजीयू) स्कूल ऑफ लिबरल आर्ट्समध्ये उद्योगाभिमुख आणि भविष्यकालीन गरजांनुसार मानसशास्त्राचे शिक्षण दिले जात आहे. विद्यापीठामार्फत बी.एस्सी. (ऑनर्स), एम.एस्सी. आणि पीएच.डी. (मानसशास्त्र) हे अभ्यासक्रम उपलब्ध असून विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक विचार, संवाद कौशल्ये, नैतिक मूल्ये आणि व्यावसायिक क्षमता विकसित करण्यावर भर दिला जातो. अभ्यासक्रमात सैद्धांतिक शिक्षणासोबतच केस स्टडी, मानसशास्त्रीय चाचण्या, संशोधन प्रकल्प, इंटर्नशिप आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद यांचा समावेश असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो. त्यामुळे मानसिक आरोग्य सेवा, क्लिनिकल आणि समुपदेशन मानसशास्त्र, मानव संसाधन (एचआर), संशोधन, अध्यापन, समुदाय आरोग्य सेवा आणि संस्थात्मक विकास अशा विविध क्षेत्रांत करिअरच्या संधी उपलब्ध होत आहेत.

ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सोमनाथ पी. पाटील यांनी सांगितले की, तंत्रज्ञानामुळे जगात मोठे बदल होत असले तरी मानवी वर्तन समजून घेण्याचे महत्त्व अधिक वाढत आहे. मानसशास्त्र हे केवळ समुपदेशनापुरते मर्यादित न राहता आरोग्य, शिक्षण, कॉर्पोरेट नेतृत्व, सार्वजनिक धोरणे आणि समाजविकासातही महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

वैज्ञानिक ज्ञान, सहानुभूती, नैतिक जबाबदारी आणि व्यावहारिक कौशल्यांचा समतोल साधणारे व्यावसायिक घडविण्यास विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले

विद्यापीठातील प्राध्यापकांच्या मते, भविष्यातील मानसशास्त्रज्ञांकडे शैक्षणिक गुणवत्तेसोबतच व्यावहारिक कौशल्येही असणे आवश्यक आहे. संशोधनाधारित शिक्षण, आंतरशाखीय सहकार्य आणि उद्योग क्षेत्राशी सातत्यपूर्ण संवाद यांमुळे विद्यार्थ्यांना मानवी वर्तनाचा वैज्ञानिक, वैद्यकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करण्याची संधी मिळते.

मानसिक आरोग्य क्षेत्रातील वाढत्या संधींच्या पार्श्वभूमीवर ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठ पदवीपासून पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण उपलब्ध करून देत असून, सक्षम मानसशास्त्रज्ञ, संशोधक, समुपदेशक आणि वर्तनतज्ज्ञ घडवून समाजाच्या सर्वांगीण विकासात योगदान देण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### देशाची सुरक्षा, सन्मान आणि कल्याण हेच आपले मुख्य ध्येय असले पाहिजे!”

**राजगुरुनगर : दैनिक संध्या**

देशाची सुरक्षा, सन्मान आणि कल्याण हेच आपले मुख्य ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन एअर कमोडर गणेश जोशी यांनी केले. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ, पुणे विभाग व खेड तालुका एज्युकेशन सोसायटी, राजगुरुनगर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते. खेड, आंबेगाव, जुन्नर तालुक्यातील खाजगी विनाअनुदानित इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या संस्था-चालकांची व मुख्याध्यापकांची बैठक खेड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या बाफना रंगमंदिरामध्ये २३ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. बैठकीस महामंडळाचे राज्य प्रतिनिधी शरदचंद्र धारस्कर, उपाध्यक्षा जागृती धर्माधिकारी, पुणे विभागाचे अध्यक्ष गणपतराव बलवडकर, खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अजित लुणावत, मानद सचिव एअर कमोडर जोशी, सदस्य डॉ. प्रदीप शेवाळे, हिरामण सातकर, दत्तात्रय सांडभोर, गणेश घुमटकर, अँड संदीप भोसले, उर्मिला सांडभोर, रेखाताई क्षोत्रिय, मुख्य व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी म्हणाले शाळा हा निकोप समाज निर्मितीचा एक महत्वाचा घटक आहे व शाळा हे निकोप समाजनिर्मितीचे एक महत्वाचे माध्यम आहे. सर्व शाळांनी विदयार्थी केंद्रबिंदू मानून विदयार्थ्यांचा, शाळेचा, समाजाचा व प्रामुख्याने देशाचा विकास करावा असेही नमूद केले. सभेची सुरुवात संस्थेचे मानद सचिव एअर कमोडर गणेश त्र्यंबक जोशी यांनी विषय पत्रिकेचे वाचन करून केली.

### सराफ सुवर्णकार संरक्षण समितीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी सिमा काळंगे

**भिगवण : दैनिक संध्या**



भारतीय नरहरी सेना प्रणित सराफ सुवर्णकार संरक्षण समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या महिला प्रदेश अध्यक्षपदी भिगवण येथील सुप्रसिद्ध सराफ सीमा अनिल काळंगे यांची निवड करण्यात आली आहे. समितीचे प्रमुख मार्गदर्शक काकासाहेब बुऱ्हाडे तसेच प्रदेशाध्यक्ष उमेशशेठ बुऱ्हाडे यांच्या आदेशानुसार, राज्य उपाध्यक्ष सुजीत जगताप आणि राज्य कार्याध्यक्ष शशिकांत दीक्षित यांच्या विनंतीवरून ही नियुक्ती करण्यात आली. सराफ सुवर्णकार समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी, महिलांना संघटित करण्यासाठी आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदविण्यासाठी ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. सीमा काळंगे यांच्या या निवडीबद्दल राज्य कायदेविषयक सल्लागार प्रमुख अॅड. किरण कावळे, राज्य महासचिव गणेशजी टाक, राज्य सचिव गणेश बनछोड, सर्व कोअर कमिटी सदस्य, जिल्हा व तालुका पदाधिकारी तसेच सराफ सुवर्णकार बांधवांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### नारायणगाव येथे छात्रसेना प्रथम वर्षाची निवड प्रक्रिया संपन्न

**नारायणगाव : दैनिक संध्या**



ग्रामोन्नती मंडळ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव येथे ३६ महाराष्ट्र बटालियन, पुणे यांच्या वतीने एनसीसी प्रथम वर्ष प्रवेश निवड प्रक्रिया महाविद्यालयाच्या मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या निवड प्रक्रियेस प्रथम वर्षातील सुमारे ११३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यामधून फक्त 38 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली त्यामध्ये मुले 16 व मुली 21 एकूण 38 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये देशसेवा, शिस्त, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी एनसीसीमध्ये सहभागी होण्याची मोठी उत्सुकता पाहायला मिळाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांच्या हस्ते सुभेदार हरदीप सिंग यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयाचे असोसिएट एनसीसी ऑफिसर कॅप्टन दिलीप शिवणे यांच्या हस्ते ट्रेनिंग जेसीओ परविंदर सिंग यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर उपस्थित पीआय स्टाफचे स्वागत करण्यात आले. या निवड प्रक्रियेसाठी सुभेदार हरदीप सिंग, ट्रेनिंग जेसीओ परविंदर सिंग, शमशेर सिंग आणि गुरजीत सिंग यांच्यासह ३६ महाराष्ट्र बटालियन, पुणे येथील पीआय स्टाफ उपस्थित होता. पीआय स्टाफने विद्यार्थ्यांची प्रथम वर्ष निवडीमध्ये शारीरिक क्षमता, शिस्त, आत्मविश्वास आणि एनसीसीसाठीची पात्रता तपासण्यासाठी विविध चाचण्या घेतल्या. यामध्ये मुलींसाठी ८०० मीटर धावणे, मुलांसाठी १६०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे तसेच पुश-अप्स, सिट-अप्स आणि व लेखी परीक्षा 40 गुणांची घेण्यात आली.तसेच यामध्ये इतर आवश्यक शारीरिक चाचण्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने सर्व चाचण्या पूर्ण केल्या. ३६ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर यांच्या तर्फे मुलाखत व संप्रेषण कौशल्य हे 31 जुलै 2026 रोजी ठीक बारा वाजता घेण्यात येणार आहे. ही मुलाखत वीस गुणांची असेल असे एकूण शंभर गुणांची परीक्षा प्रथम वर्ष निवडीसाठी घेण्यात आली आहे.

### येडगाव परिसरात पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू

**नारायणगाव : दैनिक संध्या**



येडगाव परिसरात एक भीषण रस्ता अपघात झाला आहे. वेगाने येणाऱ्या एका पिकअप वाहनाने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात एका ५५ वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी पिकअप चालकाविरुद्ध नारायणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवीण यशवंत गुंजाळ वय ५५, रा. बेल्हे हे सोमवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून क्रमांक एमएच १४ जेव्ही ५३५६ बोरी-जाधववाडी मार्गाने जात होते. त्याच वेळी येडगाव येथील गणेशनगर परिसरात विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका पिकअप वाहनाने क्रमांक एमएच १४ जीयु ४८०३ त्यांच्या दुचाकीला भीषण धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की पिकअप वाहन थेट दुचाकीवरच उलटले. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या प्रवीण गुंजाळ यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेप्रकरणी भास्कर मारुती जाधव रा. बोरी- जाधववाडी, ता. जुन्नर यांनी फिर्याद दिली. या प्रकरणी पोलिसांनी पिकअप चालक आकाश बाबू चव्हाण रा. आळे, ता. जुन्नर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील कारवाई सुरू आहे.

# रक्तदान, पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणाला प्रोत्साहन

■ सोमेश्वरनगर (दै. संध्या)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त मगरवाडी, सोरटेवाडी येथे रक्तदान,पर्यावरण संवर्धन आणि शैक्षणिक मदतीचा संगम घडवून आणणारे विविध सामाजिक उपक्रम पार पडले. नवनाथ उद्योग समूहाचे अध्यक्ष संग्राम सोरटे आणि ग्रामपंचायत मगरवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमांत भव्य रक्तदान शिबिर, सुमारे तीन हजार वृक्षांचे वाटप तसेच शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा गणवेशांचे वितरण करण्यात आले. समाजोपयोगी उपक्रमांद्वारे अजितदादांच्या स्मृतींना अनोखे अभिवादन करण्यात आले.

सोरटेवाडी ग्रामपंचायतसमोरील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक संभाजी होळकर आणि संग्राम सोरटे यांच्या हस्ते झाले. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे २५४ रक्तपिशव्यांचे संकलन झाले. रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यातून दिवंगत अजितदादा पवार यांना खरी श्रद्धांजली अर्पण करण्यात आल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी देवेंद्र सोरटे,विकी सोरटे,शेखर सोरटे आणि सचिन शेंडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



मगरवाडीत स्व. अजित दादांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परिसरात सुमारे तीन हजार वृक्षांचे वाटप करण्याचा संकल्प करण्यात आला असून त्यापैकी एक हजार वृक्षांचे वितरण मगरवाडीतील ग्रामस्थांना करण्यात आले. नवनाथ उद्योग समूह गेल्या वीस वर्षांपासून सातत्याने वृक्षसंवर्धनाचा उपक्रम राबवत आहे. या प्रयत्नांमुळे गावातील वाढलेली हिरवाई, घरासमोरची फळझाडे आणि रस्त्यालगत उभी असलेली वृक्षराजी या उपक्रमाच्या यशाची साक्ष देत आहेत.

शिक्षणाबरोबरच क्रीडेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मगरवाडी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा गणवेश व खाऊचे वितरण करण्यात आले.

संभाजी होळकर, रोहिणी कदम ढोले-पाटील,बाबा चोरमले,जितेंद्र पवार,तानाजी सोरटे,संग्राम सोरटे आणि ग्रामस्थांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश प्रदान करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाने विशेष रंगत आली.

नवनाथ उद्योग समूहाने सोमेश्वर पंचक्रोशीत विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले असून श्रीक्षेत्र सोमेश्वर येथील ऐतिहासिक बारवेचा जीर्णोद्धारही केला आहे. या बारवेचे उद्घाटन दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले होते.त्यावेळी त्यांनी या ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनासाठी करण्यात आलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले होते.

यावेळी संभाजी होळकर,जिल्हा परिषद सदस्या रोहिणी कदम ढोले-पाटील,बारामती पंचायत समितीचे गटनेते बाबा चोरमले,पंचायत समिती सदस्य जितेंद्र पवार,नवनाथ उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तानाजी सोरटे, विजयकुमार सोरटे,सरपंच विनिता हगवणे उपसरपंच अलका येळे, आत्माराम सोरटे,मधुकर सोरटे, सोमनाथ सोरटे,श्रीपाल सोरटे, दत्तात्रय शेंडकर,रामभाऊ शेलार, माजी सरपंच अजित सोरटे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संग्राम सोरटे म्हणाले, "अजितदादांचे विचार आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी हीच आमच्यासाठी प्रेरणा आहे. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी आम्ही हयात असेपर्यंत समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत राहण्याचा आमचा संकल्प आहे."

## ठाकरवाडीतील आदिवासींसाठी नवीन रुग्णवाहिका भेट

■ नारायणगाव(दै. संध्या)

वारूळवाडी येथील ठाकरवाडीतील आदिवासी बांधवांसाठी सामाजिक कार्यकर्ते दिवंगत अनिल दादाभाऊ खैरे यांच्या स्मरणार्थ रुग्णवाहिका भेट देण्यात आली आहे. 'राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान'चे संस्थापक योगेश पाटे यांच्या विशेष प्रयत्नातून हा उपक्रम राबवण्यात आला.या रुग्णवाहिकेचे लोकार्पण आमदार शरद सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

यामुळे स्थानिक भागातील गरोदरमाता आणि गंभीर रुग्णांना वेळेत वैद्यकीय उपचार मिळण्यास मोठी मदत होणार आहे, असा विश्वास आमदार सोनवणे यांनी याप्रसंगी व्यक्त केला. नारायणगाव येथील समाज मंदिरात पार पडलेल्या या कार्यक्रमात नारायणगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच योगेश पाटे, प्रिया खैरे यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी तहसीलदार रणजीत भोसले, जिल्हा परिषद सदस्या नेहा पाटे, माजी सरपंच आत्माराम संते, पंचायत समिती सदस्य सुषमा वाव्हळ, जंगल कोल्हे, विनायक भुजबळ, जयश्री बनकर, विकास तोडकरी, जुबेर आतार, आरिफ आतार, सचिन वारुळे, राजेंद्र मेहेर यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी आमदार सोनवणे म्हणाले, "नारायणगाव येथे नेवकर पूल




अद्ययावत वाहन तळ उभारणे यासह नारायणगाव जिल्हा परिषद गटातील सरपंच पाटे यांनी सुचवलेली सर्व विकासकामे मार्गी लावली जातील."

प्रतिष्ठानचे संस्थापक योगेश पाटे यांनी सांगितले की, दिवंगत अनिल खैरे यांच्या स्मरणार्थ वर्षभरात चार मोठी आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. ज्यातून आतापर्यंत सुमारे दोन हजार रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीत आदिवासी बांधवांना रुग्णवाहिका देण्याचे जे आश्वासन दिले होते, ते आज पूर्ण केल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत कोल्हे आणि अजित वाजगे यांनी केले.

## ‘स्मार्ट मीटरची सक्ती नको; गोरगरीब व शेतकरी वर्गावर अन्याय झाल्यास रस्त्यावर उतरू’ – स्वप्नील कुंजीर पाटील

■ उरुळी कांचन (दै. संध्या)

स्मार्ट मीटरच्या सक्तीच्या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बुधवारी (ता. २९ जुलै) उरुळी कांचन (ता. हवेली) येथील महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. महावितरणचे उपकार्यकारी अभियंता महेश धाडवे यांच्या कार्यालयात बसून आंदोलन करत शिवसैनिकांनी निषेध व्यक्त केला तसेच स्मार्ट मीटरच्या सक्तीमुळे गोरगरीब नागरिक, शेतकरी आणि सर्वसामान्य वीज ग्राहकांवर अन्याय होणार असल्याचा आरोप करत ही सक्ती तात्काळ थांबविण्याची मागणी केली. तसेच यावेळी महावितरण प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना हवेली तालुका प्रमुख स्वप्नील कुंजीर पाटील, उरुळी कांचन शहर प्रमुख सचिन कांचन, उपतालुका प्रमुख अनिल कदम, युवासेना तालुका प्रमुख प्रकाश तुपे, अवधूत राऊत यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

स्मार्ट मीटर योजनेच्या समर्थन आणि विरोधातील भूमिका यामुळे उरुळी कांचन परिसरात या विषयावर चर्चा सुरू असून, नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्याची गरज व्यक्त होत आहे.



शासनाने वीज ग्राहकांच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घ्यावा, अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा शिवसेना हवेली तालुका प्रमुख स्वप्नील कुंजीर पाटील यांनी दिला. तसेच "स्मार्ट मीटरच्या नावाखाली गोरगरीब, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडू नये. जनतेच्या हिताला बाधा पोहोचणारे निर्णय शिवसेना सहन करणार नाही. नागरिकांवर अन्याय झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल.

**-स्वप्निल कुंजीर पाटील - शिवसेना (उबाठा) हवेली तालुकाप्रमुख**

विद्युत कायदा २००३ तसेच सुधारणा नियम २०२६ नुसार सर्व वीज कंपन्यांना आपल्या ग्राहकांकडे निश्चित मुदतीत स्मार्ट मीटर बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार जुने मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. अचूक बिलिंग, वीज चोरी रोखणे, वीज पुरवठ्याची गुणवत्ता सुधारणे आणि ग्राहकांना अधिक पारदर्शक सेवा देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्राहकांनी यासाठी सहकार्य करावे.

**- महेश धाडवे - उपकार्यकारी अभियंता, उरुळी कांचन**

## जेजुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मावडी क. प. परिसरात घरफोडी

■ जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील माळशिरस व मावडी क.प. परिसरातील एका रात्रीत दोन घरांची घरफोडी करीत दोन दुचाकीची चोरी करण्यात आली आहे. या घरफोडीत सोन्या चांदीचे दागिने, रोख रक्कम तसेच दोन दुचाकीसह एकूण ८लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याशिवाय इतर चार घरातही चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला.

याबाबत जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दि. २८ जुलै रोजी मध्यरात्रीनंतर अज्ञात चोरट्यानी माळशिरस येथील बाळासाहेब तुकाराम यादव यांच्या घरातील सोन्याच्या पोती,

**दुचाकीसह ऐवज लंपास**

गंठण, बोरमाळ, चेन, डोरले, अंगठ्या, कर्णफूले, नथ, बदाम, झुबे चांदीचे दागिने तसेच ४३ हजार रुपयांची रोख रक्कम असा मोठा ऐवज चोरून नेला.

याशिवाय चोरट्यानी निर्मला महादेव मोरे, प्रवीण तुकाराम फडतरे, राजेंद्र गद्रे, सतीश बोरावके यांच्या घरी चोरी करण्याचा प्रयत्न केला. अशोक अनंता कांबळे यांची हिरो होंडा स्पेंडर ही दुचाकी चोरून नेली.

यानंतर चोरट्यानी मावडी क.प. येथील अनिल किसन खोमणे यांच्या घराचा दरवाजा व खिडकीचे ग्रील कापून घरात प्रवेश केला. घरातील सोन्याचे अक्कासाहेब डोरले, ६३ मनी असलेले दुसरे डोरले, चांदीची मासोळी, जोडवी असा ऐवज चोरून नेला. मावडी क. प. येथीलच महेश दिलीप देशमुख यांची होंडा डिलक्स ही दुचाकी चोरून नेली.या दोन्ही ठिकाणचा एकूण ८लाख ८१ हजारांचा ऐवज चोरीस गेला आहे. एकाच रात्रीत दोन गावात घरफोडी आणि चार घरात चोरीचा प्रयत्न आणि दुचाकी चोरीच्या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या चोरीच्या घटनांचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार हे करीत आहेत.

## निष्काळजीपणाचा फटका! रस्त्यावर तळे, शाळा-ग्रामपंचायत पाण्याखाली

■ वेल्हे (पुणे) (दै. संध्या)

वेल्हे चेलाडी रस्त्यावरील मार्गासनी (ता. राजगड) गावच्या हद्दीमध्ये रस्त्याच्या बाजूने नालेसफाई व गटार सफाई न केल्याने मुख्य रस्त्यावर तसेच येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच ग्रामपंचायत कार्यालयात समोर मोठ्या प्रमाणात पाणी साचले गेल्याने तळ्याचे स्वरूप आले होते . या ठिकाणी मोठी दुर्घटना झाल्यावरच सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार का असा सवाल नागरिक करीत आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. राजगड तालुक्यामध्ये होत असलेल्या

**आंदोलनाचा इशारा**

अतिवृष्टीचा फटका वेल्हे चेलाडी मार्गावरील व किल्ले राजगडचे प्रवेशदार असलेल्या मार्गासनी गावाला मोठ्या प्रमाणात बसला आहे .रस्त्याच्या दोन्ही बाजूनी साईड पट्ट्यांची दुरुस्ती न केल्यामुळे तसेच गटारांची स्वच्छता न केल्याने पावसाचे पूर्ण पाणी हे मार्गासनी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर असलेल्या मुख्य रस्त्यावर साचले गेले.

# अंत्ययात्रेलाही रेल्वे रुळांचा अडथळा!

**नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरूच : ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्काराचा निर्णय**

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

लोणी काळभोर परिसरातील काही भागांमध्ये आजही नागरिकांना मूलभूत सुविधांअभावी हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. माणसाला जिवंत असतानाअनेक संकटाचा सामना करावा लागत आहे परंतु मृत्यू नंतर सुद्धा त्यांच्या अत्यंयात्रेची हेळसांड पुढारी म्हणून घेणाऱ्यांमुळे होत असल्याची घटना लोणी काळभोर येथे घडत आहे .याबाबत खासदार, आमदार व ग्रामपंचायतीचे पुर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याचाच प्रत्यय अंत्ययात्रेच्या वेळी येत असून, स्मशानभूमीकडे जाण्यासाठी नागरिकांना रेल्वे रुळ ओलांडून जावे लागत आहे. त्यामुळे प्रत्येक अंत्ययात्रेदरम्यान मोठा जीवितधोका निर्माण होत असून, ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.स्मशानभूमीकडे जाण्यासाठी स्वतंत्र



आणि सुरक्षित रस्ता नसल्याने अंत्ययात्रेत सहभागी होणाऱ्या नागरिकांना रेल्वे मार्ग ओलांडावा लागतो. वृद्ध, महिला आणि लहान मुलांनाही हा धोकादायक प्रवास करावा लागत असल्याने एखादी दुर्घटना घडण्याची भीती कायम आहे. रेल्वेगाड्यांची सततची ये-जा लक्षात घेता, ही परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. लोणी काळभोर येथील पुणे - सोलापूर रेल्वे लाईनच्या पलीकडे साधारण पाच ते सात हजार लोकसंख्या असुन दळणवळणासाठी त्यांना पाच किलोमीटर लांबुन म्हणजे थेऊरफाटा येथुन यावे लागते .हा वळसा वाचविण्यासाठी

माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांनी खासदार असताना या रस्त्याची पाहणी करून रेल्वे लाईन मधुन जाणाऱ्या मोरीची (छोटा भुयारी मार्ग) दुरुस्ती करून दिली होती. त्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला होता. पण या मोरीच्याशेजारील शेतकऱ्यांनी जागा न दिल्याने ती आता बंद अवस्थेत आहे. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी रेल्वे अधिकाऱ्यांना निवेदन देऊन नवीन रेल्वे भुयारी मार्ग करण्यासाठी रितसर मागणी केली . त्या मागणीचा विचार करून रेल्वे खात्याने जुन्या भुयारी मार्गाच्या जवळ नवीन भुयारी मार्ग करण्याची परवानगी दिली. त्यानंतर काम पण चालू केले रेल्वेचा मेगाब्लॉक पण घेतला रेल्वे रुळ कट पण करण्यात आले . त्याक्षणी नागरिकांना अतिशय आनंद झाला परंतु क्षणात नागरिकांच्या आनंदावर पाणी पडले आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी हे काम थांबवले. लगेच नागरिकांच्या मध्ये चर्चा सुरू झाली की एका पुढाऱ्यांने हे काम थांबविण्यासाठी प्रयत्न केला.त्यानंतर स्थानिक नागरिकांनी खासदार डॉ .अमोल कोल्हे ,आमदार माऊली कटके व रेल्वे अधिकाऱ्यांशी पत्र व्यवहार केला .परंतु पुढारी म्हणून घेणाऱ्यांनी सतत अडथळे आणुन हे काम थांबवले असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. ग्रामस्थांनी अनेक वेळा संबंधित प्रशासन, रेल्वे विभाग आणि लोकप्रतिनिधींकडे सुरक्षित भुयारी मार्गाची मागणी केली आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

"मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी जातानाही जीव मुठीत धरून रेल्वे रुळ ओलांडावे लागतात. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?" असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.या गंभीर प्रश्नाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन स्मशानभूमीकडे जाण्यासाठी भुयारी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

**ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्काराचा निर्णय**

**भुयारी मार्गासाठी ग्रामस्थ एकवटले :** जोपर्यंत भुयारी मार्ग होत नाही तोपर्यंत येणाऱ्या सर्व निवडणूकी मध्ये बहिष्कार घालण्याचा निर्णय सर्व ग्रामस्थांनी घेतला आहे. आम्हालाच मुलभूत गरजा जर मिळत नसतील तर मतदान करण्याचा काय उपयोग. कुणीही लोकप्रतिनिधी आमच्या मुलभूत गरजा कुणाच्या फायदयासाठी हिसकावून घेऊ शकत नाही .जर असे झाले तर त्याला निवडणूकीवर बहिष्कार घालून कात्रजचा घाट दाखविण्यात येईल असे ग्रामस्थांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### आंदोलनामध्ये जखमी पोलिसांच्या कुटुंबीयांनी सांगितली आपबिती

दिल्ली : जंतर-मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीचे नीट परिक्षेसाठी आंदोलन झाले. या आंदोलनादरम्यान आणि 'पार्लमेंट मार्च'च्या वेळी झालेल्या हिंसाचारात जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांचे दुःख आता समोर आले आहे. या हिंसाचारात गंभीर जखमी झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन आपली व्यथा मांडली. पत्रकार परिषदेदरम्यान कुटुंबीय भावूक झालेले दिसले. जखमी पोलिसाच्या एका कुटुंबीयाने डोळ्यात अश्रू आणून आपबिती सांगितली, "त्या दिवशी माझे वडील ड्युटीवरून घरी परतले तेव्हा त्यांचा खाकी गणवेश पूर्णपणे रक्ताने लाल झाला होता. त्यांच्या डोक्याला आणि हातांना गंभीर जखमा झाल्या होत्या. दिल्लीपोलिसांच्या एका एसीपीच्या पत्नी अवनीत कौर म्हणाल्या, "२० जुलैच्या रात्री, जेव्हा माझे पती जखमी अवस्थेत घरी परतले, तेव्हा त्यांची अवस्था पाहून माझा जीव कासावीस झाला. ते दृश्य माझ्यासाठी आणि आमच्या २ वर्षांच्या मुलीसाठी वेदनादायी आणि धक्कादायक होते. आपल्या वडिलांना त्या अवस्थेत पाहून माझी मुलगी खूप घाबरली होती. अवनीत कौर म्हणाल्या, "लोक हे विसरतात की पोलीस अधिकारी म्हणजे फक्त एक व्यक्ती किंवा गणवेश नसतो. त्याच्या पाठीशी त्याचे कुटुंब असते, त्याची पत्नी, लहान मुले आणि वृद्ध आई-वडील, हे घरी प्रत्येक क्षणी त्याच्या सुरक्षित परतण्याची वाट पाहत असतात. या पत्रकार परिषदेमध्ये जखमी झालेल्या पोलिसांचे कुटुंबीय सहभागी झाले होते. त्यांनी आंदोलन काळात आलेले अनुभव सांगितले. यावेळी जखमी झालेल्या एका पोलिस अधिकाऱ्याच्या मुलीने सांगितले की, पोलिसात भरती होण्यापूर्वी माझे वडील भारतीय नौदलात मरीन कमांडो होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील १५ वर्षे भारतीय नौदलाला दिली. त्या दिवशी, माझ्या वडिलांची नेमणूक बॅरिकेड्सवर झाली होती, तिथे प्रचंड जमाव जमला होता. बाबा आम्हाला म्हणाले की, हे आता केवळ विद्यार्थ्यांचे आंदोलन राहिलेले नाही. त्यात काही समाजकंटकांनी शिरकाव केला आहे. "२५ तारखेला आंदोलनावेळी माझ्या वडिलांना त्या आंदोलकांनी जमावात जबरदस्ती ओढून घेतले आणि हल्ला केला. यावेळी ते मरता मरता वाचले. हल्ल्यानंतर ते घटनास्थळी चार तासांहून अधिक वेळ बेशुद्ध अवस्थेत पडून होते. त्यांना घरी आणले, तेव्हा त्यांचा पूर्ण गणवेश रक्ताने माखलेला होता. एकीकडे, माझे वडील रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत होते, त्यांचा गणवेश रक्ताने भिजलेला होता, पण, मी सोशल मीडिया उघडले, तेव्हा त्यावर माझ्या वडिलांना एक गुन्हेगार आणि खलनायक म्हणून दाखवले जात होते, असेही त्या मुलीने सांगितले.

### 'सासरच्या लोकांची मानसिकता कधीच बदलू शकत नाही',

दिल्ली : डोळ्यात अश्रूंच्या धारा, एक माफी आणि शापित म्हटल्याची वेदना... एक व्हिडीओ रेकॉर्ड करून सृष्टीने आयुष्य संपवले. तिच्या व्हिडीओने सगळ्यांच्याच काळजात कालवाकालव होत आहे. डेहराडूनमध्ये आत्महत्या केलेल्या सृष्टीचा हृदयद्रावक व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर शेअर केला जात आहे. पती आणि सासरच्या मंडळींकडून छळ असह्य झाल्याने तिने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासकीय शाळेत शिक्षिका असलेल्या सृष्टी कंधारी हिचा विवाह गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये सरकारी कर्मचारी असलेल्या सौरभ रतुरी याच्याशी झाला होता. ते देहरादून शहरापासून सुमारे २० किमी अंतरावर असलेल्या डोईवाला भागात राहत होते. कंधारी याच्या आईने पोलिसांत दिलेल्या तक्रारीत असा आरोप केला आहे की, तिच्या मुलीचा हुंड्यासाठी मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला आणि तिचे पती व सासरची मंडळी तिला सतत कमनशिबी आणि शापित म्हणत असत. गळफास लावून घेण्यापूर्वी तिने रेकॉर्ड केलेल्या ९० सेकंदांच्या व्हिडिओमध्ये सृष्टी हमसून हमसून रडताना आणि चेहऱ्यावरील अश्रू पुसताना दिसत आहे. व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरू झाल्यानंतर ३५ सेकंदांनी ती कसेबसे तिचे पहिले शब्द उच्चारते. "सॉरी मम्मी, मी अशी जात आहे," ती रडता रडता बोलते. "सर्व काही खूप विचित्र झाले आहे. मी हे सहा महिन्यांपासून सहन करत आहे. आता मी हे आणखी सहन करू शकत नाही. त्यांची मानसिकता कधीही बदलू शकत नाही. लग्नानंतर घडलेल्या गोष्टींसाठी ते मलाच दोष देत राहतात. मला शापित म्हणत आहेत," असे ती व्हिडिओच्या शेवटी म्हणते. सृष्टीने बुधवारी (२९ जुलै) आत्महत्या केली आणि तिच्या आईने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सृष्टीचा पती सौरभ, सासू परविना आणि नणंद चारू यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. डोईवालाच्या पोलीस अधिकारी वंदना वर्मा यांनी सांगितले की, हुंडाबळीशी संबंधित कलमांखाली एफआयआर नोंदवण्यात आला असून शवविच्छेदन करण्यात आले आहे. "आम्हाला माहिती मिळाली की एका महिलेने गळफास लावून आत्महत्या केली आहे. त्यानंतर पोलीस पथक आणि फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. शवविच्छेदन करण्यात आले आहे. महिलेच्या आईने सासरच्या लोकांकडून छळ झाल्याचा आरोप केला आहे," असे वर्मा म्हणाल्या. "तिचे आठ महिन्यांपूर्वी लग्न झाले होते. सृष्टी सरकारी शिक्षिका होती आणि तिचा पतीही एका सरकारी विभागात काम करतो," असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

# अण्णाभाऊ साठे : लेखनाची प्रेरणा

**समाजातील उपेक्षित, शोषित आणि वंचित घटकांच्या जीवनाला आपल्या सशक्त लेखणीतून शब्दबद्ध करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या साहित्याने केवळ मराठी साहित्य समृद्ध केले नाही, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळही अधिक व्यापक केली. त्यांनी आयुष्यभर लेखणीला समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन मानले आणि साहित्याच्या माध्यमातून अन्याय, विषमता, गरिबी, शोषण आणि मानवी वेदना यांना वाचा फोडली. म्हणूनच त्यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये लेखनाची प्रेरणा जागविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामागील मूलभूत हेतू म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने, प्रत्येक तरुणाने आणि प्रत्येक संवेदनशील नागरिकाने लेखनाच्या माध्यमातून समाजाशी नाते जोडावे, आपले विचार सुसंस्कृतपणे व्यक्त करावेत आणि मराठी साहित्यविश्व अधिक समृद्ध करावे हा आहे. शासन परिपत्रकातही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ समाजातील सर्व स्तरांतील प्रतिभावंतांना लेखनाची प्रेरणा मिळावी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विविध साहित्यिक उपक्रम आयोजित व्हावेत.**



१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्मलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्यांना शालेय शिक्षण फारसे घेता आले नाही; परंतु जीवनाच्या कठीण अनुभवांनी त्यांना घडविले. परिस्थितीमुळे त्यांचे कुटुंब मुंबईत स्थलांतरित झाले. गिरणगावातील कष्टकरी जीवन, झोपडपट्ट्यांतील संघर्ष, कामगारांचे हाल, जातीय विषमता आणि सामाजिक अन्याय त्यांनी अत्यंत जवळून अनुभवला. याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला वास्तववादी स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी पुस्तकांमधून जितके शिकले, त्याहून अधिक समाजातून शिकले. त्यामुळे त्यांचे साहित्य कृत्रिम न वाटता जिवंत जीवनाचा आरसा बनले. त्यांनी कधीही राजवाड्यांतील वैभवाची कथा लिहिली नाही; त्यांनी झोपडीतील माणसाचे अश्रू, घाम आणि संघर्ष यांनाच आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले.

अण्णाभाऊ साठे हे लोकशाहीर म्हणून जितके लोकप्रिय होते तितकेच ते एक समर्थ कादंबरीकार, कथाकार, लोकनाट्यकार आणि सामाजिक विचारवंत होते. त्यांनी विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिक, दलित, स्थलांतरित, शेतमजूर, स्त्रिया, कष्टकरी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या माणसांचे जीवन अत्यंत प्रभावीपणे चित्रित झाले आहे. त्यांनी साहित्याला केवळ सौंदर्याचा विषय न मानता समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत संघर्ष आहे, स्वाभिमान आहे, मानवी प्रतिष्ठेचा आग्रह आहे आणि समतेचा संदेश आहे.

त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीने मराठी साहित्याला नवी दिशा दिली. अन्यायाविरुद्ध झुंज देणाऱ्या सामान्य माणसाच्या संघर्षाचे चित्रण करणारी ही कादंबरी आजही सामाजिक साहित्याचा मानदंड मानली जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या असंख्य कथा, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांनी जनतेमध्ये सामाजिक जाणीव निर्माण केली. लोकभाषेतील सहजता, कथनातील ओघवतेपणा आणि वास्तववादी आशय यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांनी लोककलेला परिवर्तनाची दिशा दिली आणि शाहिरीला सामाजिक बांधिलकीचे स्वरूप प्राप्त करून दिले.

अण्णाभाऊ साठे यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःच्या वैयक्तिक यशासाठी लेखन केले नाही. त्यांच्या लेखणीचा उद्देश समाजातील अन्याय उघड करणे, वंचितांच्या भावना व्यक्त करणे आणि सामान्य माणसाला आत्मविश्वास देणे हा होता. त्यांनी आपल्या साहित्यामधून स्वाभिमान, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा सातत्याने पुरस्कार केला. त्यांच्या मते लेखक हा समाजाचा जागरूक प्रहरी असतो. तो केवळ घटनांचे वर्णन करत नाही, तर समाजाला विचार करायला भाग पाडतो. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन आणि प्रेरणादायी वाटते.

आजच्या डिजिटल युगात अभिव्यक्तीची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. सामाजिक माध्यमे, संकेतस्थळे, ब्लॉग, ई-पुस्तके आणि विविध डिजिटल व्यासपीठांमुळे प्रत्येकाला आपले विचार मांडण्याची संधी मिळाली आहे. मात्र अभिव्यक्तीची ही संधी जबाबदारीने वापरणे तितकेच महत्त्वाचे आहे. माहितीचा वेग वाढला असला तरी विचारांची खोली कमी होत असल्याची खंत अनेक साहित्यिक व्यक्त करतात. अशा काळात अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आपल्याला शिकवते की लेखन हे केवळ प्रसिद्धी मिळविण्याचे साधन नसून समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची अभिव्यक्ती आहे. लेखकाने सत्याचा शोध घेतला पाहिजे, मानवी मूल्यांचा सन्मान केला पाहिजे आणि समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी लेखणीचा उपयोग केला पाहिजे.

याच व्यापक विचारातून महाराष्ट्र शासनाने 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन परिपत्रकानुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती व व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी, लेखनाची आवड आणि साहित्यिक संवेदनशीलता विकसित करणे हा आहे.

लेखन ही केवळ शब्दांची मांडणी नसते; ती विचारांची शिस्त, संवेदनशीलतेची अभिव्यक्ती आणि समाजाशी असलेल्या नात्याची जाणीव असते. जेव्हा एखादा विद्यार्थी कविता लिहितो, कथा रचतो, निबंध मांडतो किंवा एखाद्या सामाजिक विषयावर आपले मत व्यक्त करतो, तेव्हा तो केवळ लेखन करत नसतो; तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही करत असतो. लेखनामुळे निरीक्षणशक्ती वाढते, चिकित्सक दृष्टी विकसित होते, भाषेवर प्रभुत्व मिळते आणि समाजातील विविध प्रश्नांकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण होते. म्हणूनच 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून विचारक्षम, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा एक प्रभावी सामाजिक उपक्रम आहे.

आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे आणि सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अभिव्यक्तीची साधने बदलली असली तरी प्रभावी लेखनाचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट माहितीच्या प्रचंड प्रवाहात सत्य, विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी जपणारे लेखन अधिक आवश्यक बनले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या काळात लेखणीला परिवर्तनाचे शस्त्र बनविले; आजच्या पिढीने तीच लेखणी ज्ञान, विज्ञान, लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि मानवी संवेदनशीलता यांची वाहक बनविण्याची गरज आहे. लेखन प्रेरणा दिनाचा खरा अर्थ केवळ लेखनस्पर्धा आयोजित करणे एवढाच नसून विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची वृत्ती, चिकित्सक विचारसरणी, कल्पकता आणि सामाजिक बांधिलकी विकसित करणे हा आहे.

लेखन ही एक सर्जनशील प्रक्रिया आहे. ती माणसाला स्वतःशी संवाद साधायला शिकवते. वाचनातून विचार जन्माला येतात आणि विचारांमधून लेखन घडते. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा प्रत्यक्षात वाचन संस्कृतीलाही बळ देणारा उपक्रम आहे. ज्या समाजात वाचनाची सवय दृढ असते, त्या समाजात विचारांची देवाणघेवाण समृद्ध होते, मतभिन्नतेचा आदर वाढतो आणि लोकशाही अधिक मजबूत होते. अण्णाभाऊ साठे यांनी स्वतः औपचारिक शिक्षणाची मर्यादा असतानाही सातत्याने वाचन, निरीक्षण आणि अनुभव यांच्या बळावर स्वतःला घडविले. त्यामुळे त्यांचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, जिज्ञासा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर मोठे साहित्य निर्माण करता येते.

आज शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांची आवश्यकता आहे. शासनाच्या परिपत्रकातही कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांची व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देतात, भाषिक कौशल्य वाढवितात आणि साहित्याबद्दल आत्मीयता निर्माण करतात.

लेखनाची खरी प्रेरणा पुरस्कारातून नव्हे, तर समाजाशी असलेल्या नात्यातून निर्माण होते. जेव्हा लेखक समाजातील वेदना अनुभवतो, सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षा समजून घेतो आणि त्या प्रामाणिकपणे शब्दबद्ध करतो, तेव्हा त्याचे साहित्य काळाच्या कसोटीवर टिकते. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य याच कारणामुळे आजही अभ्यासले जाते. त्यांनी कधीही कल्पनारम्य वैभवाचे चित्र रंगविले नाही; त्यांनी वास्तवाला शब्द दिले. त्यांच्या लेखनातील पात्रे ही संघर्ष करणारी, स्वाभिमान जपणारी आणि परिवर्तनाची स्वप्ने पाहणारी माणसे आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ एका समाजघटकाचे प्रतिनिधित्व करत नाही, तर संपूर्ण मानवतेच्या संघर्षाची गाथा बनते.

मराठी भाषा ही संत, समाजसुधारक, विचारवंत आणि साहित्यिक यांच्या समृद्ध परंपरेने घडलेली भाषा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर आणि अण्णाभाऊ साठे यांसारख्या अनेक थोर व्यक्तींनी आपल्या लेखणीतून समाजमन घडविले. या परंपरेचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे. लेखन प्रेरणा दिन हा त्या जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने, संशोधकाने, शिक्षकाने आणि साहित्यप्रेमीने आपल्या अनुभवांना, निरीक्षणांना आणि विचारांना शब्दरूप देण्याचा संकल्प या दिवशी करणे आवश्यक आहे.

लेखन ही समाजपरिवर्तनाची शांत पण अत्यंत प्रभावी प्रक्रिया आहे. तलवारीने जिंकलेली मने काळानुसार बदलतात; परंतु विचारांनी जिंकलेली मने कायमस्वरूपी परिवर्तन घडवितात. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून हेच सिद्ध करून दाखविले. त्यांच्या लेखणीत संघर्ष होता, पण द्वेष नव्हता; विद्रोह होता, पण विध्वंस नव्हता; अन्यायाविरुद्ध प्रखर आवाज होता, पण मानवतेवरील विश्वास कधीही डळमळला नाही. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही सामाजिक समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रभावी प्रतीक मानले जाते.

आजच्या काळात लेखन केवळ साहित्यनिर्मितीपुरते मर्यादित राहिलेले नाही. संशोधन, पत्रकारिता, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण, उद्योग, सामाजिक कार्य आणि डिजिटल माध्यमे अशा प्रत्येक क्षेत्रात प्रभावी लेखनाचे महत्त्व वाढत आहे. विचार स्पष्टपणे आणि जबाबदारीने मांडण्याची क्षमता ही यशस्वी व्यक्तिमत्त्वाची ओळख बनली आहे. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या व्यापक ध्येयाशी जोडलेला उपक्रम आहे.

अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हे आशावाद, संघर्ष आणि सर्जनशीलतेचा प्रेरणादायी प्रवास आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी जागतिक कीर्तीचे साहित्यिक म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांनी सिद्ध केले की लेखक घडण्यासाठी संपन्न साधने नव्हे, तर जिद्द, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी आवश्यक असते. त्यांचे संपूर्ण जीवन नवोदित लेखकांसाठी एक प्रेरणादायी विद्यापीठ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहिताचे, मानवतावादी मूल्यांचे आणि सत्यनिष्ठेचे लेखन करणे.

१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ एका महान साहित्यिकाच्या जयंतीचे औचित्य नसून विचार, वाचन, लेखन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा उत्सव आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत, प्रत्येक ग्रंथालयात आणि प्रत्येक घरात या दिवसाच्या निमित्ताने वाचनाची, चिंतनाची आणि लेखनाची नवी चळवळ सुरू झाली, तर तीच अण्णाभाऊ साठे यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या लेखणीने पेटविलेली सामाजिक जागृतीची मशाल आजच्या पिढीने ज्ञान, समता, न्याय आणि मानवतेच्या प्रकाशाने अधिक तेजस्वी करावी, हाच 'लेखन प्रेरणा दिनाचा' खरा संदेश आहे.

*डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)* ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

# माझी मैना गावाकडे राहिली : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज १०६ वी जयंती ते मराठी लेखक व समाजसुधारक होते. वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचविणारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला सिद्धहस्त कादंबरीकार, लोकनाट्यकार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. ग्रामीण ढंगातील रांगड्या तमाशाला 'लोकनाट्य' हे बिरुद शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी दिले.अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांद्वारे जनजागृतीसाठी प्रयत्न केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून निर्माण झालेल्या मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या नवनिर्मितीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, अमर शेख व शाहीर कॉ. द.ना. गव्हाणकरांचे मोलाचे योगदान होते. अण्णाभाऊ साठे हे अंतर्बाह्य मार्क्सवादी होते. अण्णाभाऊ साठे म्हणजे जातींच्या उतरंडीमुळे शिक्षणापासून, समग्र विकासापासून वंचित राहिलेल्या मातंग समाजातील एक समृद्ध व्यक्तिमत्त्व होते. वैयक्तिक दुःखांचा विचार न करता; आपले विचार, कार्य व प्रतिभा यांच्या साहाय्याने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारे लोकशाहीर होते. अण्णाभाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, ८ पटकथा, ३ नाटके, एक प्रवासवर्णन, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले.**

बंगालचा दुष्काळ, तेलंगण संग्राम, पंजाब-दिल्लीचा पोवाडा, अंमळनेरचे हुतात्मे, काळ्या बाजाराचा पोवाडा, 'माझी मैना गावाकडे राहिली' ही संयुक्त महाराष्ट्र चळवळीवरील छक्कड, कामगार चळवळीवरील 'एकजुटीचा नेता' ते हिटलरच्या फॅसिझम विरोधात स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, चिनी क्रांतीवरील 'चिनी जनांची मुक्तिसेना' हे गौरवगान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील गाजलेले 'जग बदल घालुनी घाव-सांगुनी गेले भीमराव' हे गाणे, अशी अनेक गाणी, कवने, पोवाडे अण्णाभाऊ साठे यांनी रचले. त्यांनी आपल्या गाण्यांतून, पोवाड्यांतून अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांना, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले आहे. अण्णाभाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सध्याच्या सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी मांग कुटुंबात जन्म झाला. हे गाव पूर्वी कुरुंदवाड संस्थानात होते. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव व आईचे नाव वालुबाई होते. या दांपत्याने जन्मलेल्या मुलाचे नाव तुकाराम ठेवले असले तरीही सर्वजण प्रेमाने त्याला अण्णा म्हणत.अण्णा भाऊ साठे यांची दोन लग्ने झाली होती. दुसऱ्या पत्नीचे नाव जयवंताबाई. अण्णांप्रमाणेच याही साम्यवादी पक्षाच्या कार्यकर्त्या होत्या. शांताबाई आणि शकुंतलाबाई या त्यांच्या दोन मुली. आई आणि घरातील मोठे लोक दोर वळण्याच्या कामाला जात. त्यांचे वडील पोटापाण्यासाठीच मुंबईत राहत असत. त्यामुळे लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी तुकारामांवर (अण्णांचे मूळ नाव) म्हणजेच अण्णाभाऊंवर होती. त्यांच्या वडिलांनी मुंबईत उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित समाज पाहिल्याने आपल्या मुलांनी शिकले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या आग्रहामुळेच वयाच्या १४ व्या वर्षी अण्णांनी प्राथमिक शिक्षणाला सुरुवात केली. परंतु तत्कालीन मागास जातींतील मुलांसाठी त्या काळी वेगळ्या शाळा होत्या. त्या मुलांशी शिक्षकांचे वर्तनही निर्दयीपणाचे होते. वाढलेले वय, सदोष शिक्षण पद्धती यांमुळे अण्णा फार दिवस शाळेत गेलेच नाहीत.

लहानपणापासूनच त्यांना विविध छंद होते. मैदानी खेळ खेळण्याचा त्यांचा पिढीजात वारसा असल्याने दांडपट्टा चालविण्यात त्यांचा हात धरणारा कोणी नव्हते. याशिवाय जंगलात एकटे भटकणे, पोहणे, मासेमारी, शिकार करणे, विविध पक्षांशी मैत्री करणे, जंगलातील पानाफुलांमधील सूक्ष्म फरक शोधणे असे एक ना अनेक छंद त्यांना होते. या छंदांमध्ये निरागसपणे बागडण्यातच त्यांचे बालपण गेले. मोठे होत असताना त्यांच्या आवडींमध्ये वाढच होत होती. लोकगीते पाठ करून ती टिपेच्या आवाजात म्हणणे, पोवाडे, लावण्या पाठ करणे, इतरांना त्या आत्मीयतेने म्हणून दाखवणे या छंदांमुळे त्यांच्याभोवती नेहमीच मित्र मंडळी जमलेली असत.एका जत्रेत त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले. त्याचा परिणाम अण्णाभाऊंवर झाला आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊ लागले.चळवळीत सामील होऊन लोकनाट्यांत छोटी मोठी कामे त्यांनी केली. याच काळात दुष्काळ पडल्याने अण्णांच्या वडिलांनी आपल्या कुटुंबाला मुंबईत न्यायचे ठरविले. त्याच वेळी अण्णाभाऊंचे बालपण संपले. वयाच्या ११ व्या वर्षी अण्णा आपल्या आई-वडिलांबरोबर मुंबईत आले. हे कुटुंब भायखळ्याच्या चांदबीबी चाळीत राहायला गेले. त्या काळी मुंबईत स्वस्ताई असल्याने सुरुवातीचा काळ सुखाचा गेला. मुंबईत फिरताना दोन गोष्टींकडे ते आकर्षिले गेले, एक म्हणजे विविध राजकीय संघटना आणि दुसरे म्हणजे मूक चित्रपट.विविध राजकीय संघटनांचे ध्येय ब्रिटिशांना हाकलून देणे हेच होते. परंतु प्रत्येकाची विचारसरणी वेगळी होती. यांपैकी कम्युनिस्ट विचारसरणीचे अण्णा अनुयायी बनले. पक्षाच्या सभांचे आयोजन करणे, वॉलपेंटिंग करणे, हॅण्डबिले वाटणे, मोर्चे काढणे, छोट्या-मोठ्या सभेसमोर गोष्टी सांगणे, पोवाडे, लोकगीते म्हणून दाखविणे या सर्व गोष्टींमुळे कम्युनिस्ट वर्तुळात ते सर्वांना एकदम हवेहवेसे झाले. याच वेळी त्यांच्या तुकाराम या नावाचे अण्णा या नावात रूपांतर झाले.मुंबईत पोटासाठी वणवण भटकत असताना अण्णांनी हमाल, बूट पॉलिशवाला, घरगडी, हॉटेल बॉय, कोळसे वाहक, डोअरकीपर, कुत्र्याला सांभाळणारा, मुलांना खेळविणारा, उधारी वसूल करणारा, खाण कामगार, ड्रेसिंगबॉय अशी नाना प्रकारची कामे केली. यावरून त्यांच्या कष्टमय जीवनाची आपल्याला कल्पना येते. या काळातच त्यांना सिनेमा पाहण्याचा छंद लागला. या छंदानेच त्यांना साक्षर बनविले. चित्रपटांच्या पाट्या, रस्त्यावरील दुकानांच्या बोर्डवरील अक्षरे जुळवित ते साक्षर झाले. या अक्षर ओळखीनंतरच त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली.वयाच्या १७-१८ व्या वर्षी संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी अण्णांवर आली होती. गिरणी कामगार म्हणून त्यांच्या जीवनाला सुरुवात झाली होती. परंतु कोहिनूर मिलमधील नोकरी सुटल्याने त्यांच्यावर मोठेच संकट आले. या वेळी पुन्हा साठे कुटुंब वाटेगावला आले. मुंबईतील धकाधकीचे जीवन, मोर्चे, सभा, सत्याग्रह, आंदोलने या सर्व गोष्टी पाहिलेल्या

अण्णाभाऊंना वाटेगावमध्ये राहणे शक्य होत नव्हते. अत्यंत अस्वस्थतेत त्यांनी घर सोडले आणि ते त्यांच्याच नातेवाईकांच्या तमाशाच्या फडात सामील झाले. अण्णाभाऊंचा धारदार आवाज, त्यांचे पाठांतर, पेटी, तबला, ढोलकी, बुलबुल ही वाद्ये वाजवण्याची कला या गुणांमुळे त्यांचे तमाशात स्वागतच झाले. अण्णाभाऊ साठे हे लावण्या, शाहिरी काव्ये, पोवाडा या लोककलांमध्ये तरबेज होते. मराठीभाषिक स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीकरता इ.स. १९५० च्या दशकात चाललेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी लोककलेच्या माध्यमातून लोकप्रबोधन घडवून आणले.अण्णाभाऊ साठे यांची वगनाट्येही अत्यंत महत्त्वाची आहेत. या वगनाटयांसाठी अण्णाभाऊंनी तमाशा या महाराष्ट्रातील पारंपरिक लोककलेचा आकृतिबंध स्वीकारला. तमाशाच्या पारंपरिक सादरीकरणातील गण, गवळण, बतावणी आणि वग या घटकांपैकी गण, काही प्रमाणात बतावणी आणि वगनाट्य हे तीन घटकच अण्णाभाऊंनी स्वीकारले. असे असले तरी तमाशाच्या पारंपरिक आकृतिबंधात अण्णाभाऊंनी वगनाट्याच्या रूपाने पुष्कळ बदल घडवून आणले. अकलेची गोष्ट, शेटजींचे इलेक्षन, बेकायदेशीर, माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची?, मूक मिरवणूक, लोकमंत्र्यांचा दौरा, खापऱ्या चोर, बिलंदर बडवे यांसारखी वगनाटये अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची पायाभरणी करण्यासाठी लिहिली. त्यांतील गरुडाला पंख, वाघाला नखं तशी ही (मुंबई) मराठी मुलुखाला हे कवन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत विलक्षण गाजले.

अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेली प्रसिद्ध छक्कड(लावणीचा एक प्रकार) म्हणजे 'माझी मैना गावाकडं राह्यली'. या एका काव्यरचनेमुळे अण्णाभाऊ साठे यांचे नाव मराठी साहित्यात अविस्मरणीय असेल.पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन (१९५८)साली त्यांच्या हस्ते झाले.१९६१ साली अण्णाभाऊ साठे यांच्या फकिरा या कादंबरीला महाराष्ट्र सरकारचा सर्वोत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. तत्कालीन ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांनीही कादंबरीचे कौतुक केले होते.अश्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे देहावसान १८ जूलै १९६९ रोजी मुंबईत झाले.त्यांच्या १०६ व्या जयंती निमित्त त्यांना क्रांतिकारक अभिवादन.

नासिकेत कृष्णकांत पानसरे
ज्येष्ठ पत्रकार
डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार
महाराष्ट्र शासन सन्मानित



# महापूराचा विळखा!

# नीरा नदीवरील ब्रिटिशकालीन पूल आणि दत्त मंदिर पाण्याखाली

## वीर धरणातून विक्रमी ६४ हजार ५२३ क्युसेक विसर्ग

■ नीरा (दै. संध्या)

वीर धरणातून सोडण्यात आलेल्या विक्रमी ६४ हजार ५२३ क्युसेक पाण्यामुळे नीरा नदीला महापूर आला असून, नदीवरील ऐतिहासिक ब्रिटिशकालीन पूल आणि प्रसिद्ध दत्त मंदिर पुराच्या पाण्याखाली गेले आहेत. नदी दुथडी भरून वाहत असल्याने परिसरात धोक्याची परिस्थिती निर्माण झाली असून प्रशासनाने नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. सतत सुरू असलेल्या दमदार पावसामुळे नीरा खोऱ्यातील धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरू आहे. शुक्रवारी (३१ जुलै) सायंकाळी वीर धरणातून सांडव्यावरून ६२ हजार ९२४ क्युसेक आणि अतिवाहकाद्वारे १ हजार ४०० क्युसेक, असा एकूण ६४ हजार ५२३ क्युसेक विसर्ग सुरू करण्यात आला. या विसर्गामुळे नीरा नदीने रौद्ररूप धारण केले आहे. दिवसभरात विसर्गात टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात आली. सकाळी ६ वाजता ५ हजार ७१३ क्युसेक असलेला विसर्ग सकाळी ८ वाजता १४ हजार ९३९, सकाळी १० वाजता २४ हजार २२०, दुपारी १ वाजता ३३ हजार ४६८, दुपारी २ वाजता ४२ हजार ८३३, तर सायंकाळी ४ वाजता थेट ६४ हजार ५२३ क्युसेक इतका करण्यात आला.

नीरा खोऱ्यातील चारही धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणीसाठा झाला आहे. भाटघर धरण ९३.५२ टक्के, निरादेवघर ९७.४२ टक्के, गुंजवणी ९१.१६ टक्के, तर वीर धरण १०० टक्के भरले आहे. चारही धरणांमध्ये मिळून ४६.२८० टीएमसी (९५.७६ टक्के) पाणीसाठा असून, तो गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक आहे. निरादेवघर धरणातून १६ हजार ३७४ क्युसेक आणि गुंजवणी धरणातून २ हजार ९६१ क्युसेक विसर्ग सुरू असल्याने वीर धरणातील आवकही वाढली आहे. चारही धरणांमध्ये एकूण २.४७२ टीएमसी पाण्याची आवक नोंदविण्यात आली आहे. दरम्यान, नीरा शहरातील नदीकाठचा परिसर जलमय झाला असून, ब्रिटिशकालीन पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. प्रसिद्ध दत्त मंदिराला पुराच्या पाण्याने वेढा घातला असून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ऐतिहासिक पुलावरूनही पाणी वाहत आहे. हे विहंगम दृश्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली असून अनेकांनी ते मोबाईल कॅमेऱ्यात कैद केले. दरम्यान नीरा ग्रामपंचायतीच्यावतीने नीरा शहरांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊ नये म्हणून प्रयत्न केले जात आहेत.नीरा वार्ड नंबर एक मधील संभाव्य धोका लक्षात घेऊन लोकांना तातडीने सुरक्षा स्थळी जाण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर गरज पडल्यास त्यांच्या सुरक्षित निवासाची देखील तयारी करण्यात आली असल्याची माहिती उपसरपंच राजेश काकडे यांनी दिली. दरम्यान नीरा नदी काठावर गर्दी होऊन कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांच्या वतीने विशेष खबरदारी घेतली जात आहे जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रिटिशकालीन पुलाकडे जाणारा मार्ग पोलिसांनी बॅरिगेट लावून बंद केला आहे . नीरा पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार हरिचंद्र करे माजी पोलीस पाटील राजेंद्र भास्कर, प्रभारी पोलिस पाटील राहुल शिंदे यांनी या ठिकाणी खबरदारी घेत चोख बंदोबस्त ठेवला होता.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पारगाव तर्फे आळे येथील शेतकऱ्याचा ट्रॅक्टर चोरी करणारा चोरटा पोलिसांच्या जाळ्यात

नारायणगाव : दैनिक संध्या

नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीत दि. २३/७/२०२६ रोजी रात्री फिर्यादी सुनील रामदास ढोमे वय ३३ राहणार पिंपरखेड तालुका शिरूर यांचा न्यू हॉलंड कंपनीचा ट्रॅक्टर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेला होता. यावरून नारायणगाव पोलीस स्टेशन येथे गु.रजिस्टर नंबर १८४/२०२६ भारतीय न्याय संहिता ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे तपास करत असताना गुन्हे शाखा व नारायणगाव पोलीस स्टेशन कडील पथकाने सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे आरोपीचा शोध घेतला. सीसीटीव्ही फुटेज वरून सदरचा गुन्हा हा बळीराम जालिंदर तांबे वय ३२ राहणार तांबाराजुरी, ता.पाटोदा, बीड याने चोरून नेला होता.तसेच त्याला आज चोरीचा ट्रॅक्टर घेऊन आळेफाटा पोलीस स्टेशनमध्ये येणार आहे. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा तसेच नारायणगाव पोलीस स्टेशन स्टाफ यांनी सदर ठिकाणी सापळा लावून संशयित व्यक्तीस ट्रॅक्टरसह ताब्यात घेतले असून, पुढील कार्यवाहीसाठी नारायणगाव पोलिस स्टेशन येथे पाठविण्यात आले.सदर आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कार्यवाहीसाठी नारायणगाव पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे. सदरची कार्यवाही ही पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री संदिप गिल्ल सो, अप्पर पोलीस अधीक्षक श्री शुभम कुमार सो, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री धनंजय पाटील सो यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री प्रमोद क्षीरसागर, सपोनि. प्रविण सपांगे, सपोनि. महादेव शेलार, सफौ. दीपक साबळे, पोलीस हवालदार संदीप वारे, अक्षय नवले, अभिमन्यू मोटे,मंगेश लोखंडे, सोमनाथ डोके, सुभाष थोरात यांनी केली आहे.

### स्वामी समर्थ मंदिरात सहस्र दिपोत्सव



कान्हाटी : दैनिक संध्या

गुरुपौर्णिमेनिमित्त स्वामी समर्थ मंदिरामध्ये पहाटे अभिषेक करण्यात आला. महाराजांच्या प्रतिमेची पालखी मधून मिरवणूक काढण्यात आली. दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा, श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या नामघोषांमध्ये आठ दिवस समर्थ महाराजांचा मठ दुमदुमून गेला. यावेळी सहस्त्र दिपोत्सव करण्यात आला. तीन दिवसीय गुरुचरित्र पारायण, विष्णुसहस्रनामावली, १०८ सत्यनारायण महापूजा, तदनंतर बुंदी बाबा महाराजांचे पाद्यपूजन करण्यात आले. भजन, भारुड नामस्मरण आदी कार्यक्रमाने आठ दिवस मंदिर नामघोषात दुमदुमले. या पर्वकालामध्ये स्वामी समर्थ मंदिरात भाविकांची अलोट गर्दी पाहण्यात आली.

## नायगाव येथे गुरुपौर्णिमा उत्सहात साजरी

■ पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुक्याच्या पुर्व भागातील श्री क्षेत्र नायगाव येथे गुरुपौर्णिमा निमित्त भाविकांनी श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांच्या दर्शनाचा लाभ घेतला. गुरुपौर्णिमेनिमित्त पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हेच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना स्नान घालण्यात आले.मधुकर साहेबराव कांचन (खामगाव) यांच्या सौजन्याने ह.भ.प. पुंडलिक महाराज नागवडे (न्हावरा) यांच्या सुश्राव्य किर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला.त्यांनी अनेक उदाहरणे देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले.त्यांना गायन साथ दत्तात्रय बोरकर,आबा बोरकर व मृदुंग साथ तेजस खेसे यांनी दिली.भजन साथ नायगाव भजनी मंडळाने दिली.श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापुजा पुजारी मनोज जगताप यांनी केली. अन्नदान प्रकाश कड,बाळासो कड,बापु कड,विठ्ठल कड,आप्पा चौंडकर,अनंता



चौंडकर, मारूती चौंडकर,भाऊसो मेमाणे,विद्या भदाने पाटील (जळगाव), प्रशांत शेंडगे (काळखैरेवाडी),साहिल जावळे ,जीवन कांबळे (हडपसर),काळुराम यादव (माळशिरस) यांच्या वतीने करण्यात आले.मंदिर परिसराची स्वच्छता,लाईट,पाणी,दर्शनबारी आदिंची उत्तम व्यवस्था श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने केल्याचे राहुल कड यांनी सांगितले.

## ‘ओह माय डॉग’ प्री-रिलीज स्क्रीनिंगला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)

७ ऑगस्ट रोजी संपूर्ण देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणाऱ्या ‘ओह माय डॉग’ या चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी पुण्यात विशेष प्री-रिलीज स्क्रीनिंगचे आयोजन करण्यात आले. या खास कार्यक्रमाला अभिनेते जितेंद्र जोशी आणि विजय मिश्रा उपस्थित होते. स्क्रीनिंगनंतर त्यांनी माध्यम प्रतिनिधी आणि प्रेक्षकांशी संवाद साधत चित्रपटाविषयीच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. पुण्यातील प्रेक्षकांनी ‘ओह माय डॉग’ ला भरभरून प्रतिसाद दिला. चित्रपटाची भावनिक कथा, प्रभावी अभिनय आणि माणूस व कुत्रा यांच्यातील हृदयस्पर्शी नात्याचे संवेदनशील चित्रण याचे विशेष कौतुक करण्यात आले. अनेकांनी हा चित्रपट संपूर्ण कुटुंबाने एकत्र पाहावा असा असल्याचे सांगत, प्रेम, करुणा आणि सहानुभूतीचा संदेश देणारा हा चित्रपट सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या मनाला भिडणारा असल्याचे मत व्यक्त केले.



यावेळी जितेंद्र जोशी आणि विजय मिश्रा यांनी प्रेक्षकांनी दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच प्रेक्षक भावनिकदृष्ट्या या कथेशी जोडले जात असल्याचे पाहणे त्यांच्यासाठी अत्यंत समाधानकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, “प्रेक्षकांना ‘ओह माय डॉग’सोबत हसताना, आनंद घेताना आणि भावनिकरित्या जोडले जाताना पाहणे आमच्यासाठी अत्यंत समाधानकारक अनुभव आहे.” चित्रपटाचे दिग्दर्शक अमित राय म्हणाले, “हा चित्रपट प्रेम, करुणा आणि माणूस व प्राण्यांमधील निःशब्द पण अतूट नात्याचा उत्सव आहे. ७ ऑगस्टपासून देशभरातील प्रेक्षकांनी हा चित्रपट चित्रपटगृहात अनुभवावा, याची आम्हाला उत्सुकता आहे.”

पुण्यातील सकारात्मक प्रतिसादानंतर ‘ओह माय डॉग’ च्या प्रदर्शनापूर्वीचा उत्साह आणखी वाढला आहे. चित्रपटाची प्रचारमोहीम देशातील विविध शहरांमध्ये सुरू असून, ही हृदयस्पर्शी कथा अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. बाबूलाल बिस्कोप आणि थिंकिंग हॅट्स एंटरटेनमेंट यांच्या बॅनरखाली अमित राय, राजेश भारद्वाज आणि सना वारसी यांनी निर्मित केलेल्या ‘ओह माय डॉग’ मध्ये माही राय, पंकज त्रिपाठी, गीता अग्रवाल शर्मा, राजेश कुमार, पवन मल्होत्रा, सुलाख्याना बरुआ, विजय मिश्रा यांच्यासह कॅनाईन स्टार्स ऑस्कर आणि ब्रुनो तसेच २५० हून अधिक कुत्रे महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत. हा चित्रपट ७ ऑगस्ट रोजी संपूर्ण देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# शालेय गणवेशात विद्यार्थ्यांनी केली भात लागवड!

## काळदरी विद्यालयाचा कृतीशील शिक्षणाचा स्तुत्य उपक्रम

■ जेजुरी (दै. संध्या)

सध्या भात लावणीची कामे सुरू आहेत. ही सर्व माहिती विद्यार्थी पुस्तकातुन अभ्यासतात. मात्र पुस्तकात वाचलेल्या भात लावणीचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना द्यावा यासाठी मुख्याध्यापक पांडुरंग दुर्गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमशील शिक्षिका सुनंदा टकले यांनी विद्यार्थ्यांना शेतात नेऊन भात लावणी केली.

पुण्याच्या पुरंदर तालुक्यातील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज काळदरी या शाळेच्या विद्यार्थ्यांना भात लागवडीचा हा आनंद घेता आला. रोजच्या जेवणात ताटात येणारा भात नेमका कसा पिकतो अन त्यासाठी भात शेतकऱ्यांना किती काबाड कष्ट घ्यावे लागतात, हा धडा प्रत्यक्षात विध्यार्थ्यांना घेता यावा. यासाठी शिक्षकांनी अशी शक्कल लढवली होती.

शिक्षकांची ही शक्कल पाहून काही विद्यार्थीही आनंदी झाले. तोच अभ्यास आणि तीच शाळा करुन विद्यार्थी कंटाळतात. त्यामुळे चिखलात उतरुन विद्यार्थ्यांनी भात लावणीचा आनंद घेतला आणि निसर्गाच्या शाळेत रमले.

विद्यालयाजवळील असलेले शेतकरी पंढरीनाथ कुंभार यांनी सर्वांना आमच्या शेतात भात लावणीसाठी यावे असा आग्रह धरला. भात लावणी करत असताना सध्या बैलांऐवजी ट्रॅक्टरच्या साह्याने चिखलणी कशी केली जाते याच्या प्रात्यक्षिकासह भात लावणीची पद्धत-तंत्र, भात रोपांचे प्रकार, खते आदीची माहिती विद्यार्थ्यांना प्रगतशील शेतकरी पंढरीनाथ कुंभार यांनी दिली. सर्वांनी मिळून भात लावणीचा आनंद घेतला. विद्यार्थी खूपच खूश होते. कारण त्यांनी पुस्तकात वाचलेल्या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. भात लागवड करताना पाहणं आणि प्रत्यक्षात लागवड करणं यात जमीन-आस्मानचा फरक आहे. हाच फरक प्रत्यक्षात अनुभवण्यासाठी शालेय गणवेशातील विद्यार्थी थेट भात खाचरात उतरले. विद्यार्थ्यांनी पुस्तकातून लागवड



अभ्यासली होतीच, मात्र प्रात्यक्षिकातून लागवडीचा हा धडा मिळाल्यानं त्यांच्या चेहऱ्यावर एक आत्मिक समाधान होतं. सध्या सगळीकडेच पुस्तकी ज्ञान दिलं जातं त्यामुळे मुलांना बाहेरच्या जगाची माहिती फार कमी प्रमाणात शाळकरी मुलांना दिली जाते. त्यात शेती किंवा पर्यावरणासारखे विषय हे निसर्गाच्या सानिध्यात जाऊनच शिकले तर उत्तम कळतात त्यामुळे ही सगळी मुलं निसर्गाच्या कुशीत वसलेल्या शाळेत उतरले आहेत. मुलांना अनेकदा अनेक गोष्टी पुस्तकात शिकून कळत नाही. ज्या गोष्टी पुस्तकातून शिकता येतात त्या मात्र ज्या गोष्टी प्रात्यक्षिक करुनच शिकवायला हव्या त्या गोष्टींसाठी विद्यार्थ्यांना शाळेच्या बंद खोल्यांच्या बाहेर काढणं गरजेचं असतं. या बंद खोल्यांच्या बाहेरच्या शाळेत मुलांना वेगवेगळे धडे दिले पाहिजेत. शेतकरी, बळीराजा कसा राबतो, हे मुलांना कळलं पाहिजे आणि आपल्या घरात भात कसा येतो, हेदेखील मुलांना कळलं पाहिजे, यासाठी मुलांना थेट भात खाचरात घेऊन आल्याचे मुख्याध्यापक पांडुरंग दुर्गाडे सांगतात. रोज शाळेत जाऊन तोच तोच अभ्यास करुन विद्यार्थी कंटाळतात. विद्यार्थ्यांनाही काहीतरी नवीन हवंच असतं. त्याच जर विद्यार्थ्यांना निसर्गाचं शिक्षण दिलं तर विद्यार्थीदेखील रमतात. अनेक गोष्टी अंगवळणी पाडून घेण्याचं हेच वय असतं. शाळेतील शिक्षण विद्यार्थ्यांना जगाशी लढण्याची ताकद देतं. त्यामुळेच त्यांची एक सहल म्हणून शेतात किंवा बाहेर फिरायला घेऊन जात असतो, असे देखील शिक्षकांनी सांगितलं.

या प्रकल्पाचे खरे शिल्पकार असलेले सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रगतशील शेतकरी यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड या संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, संस्थेचे सचिव तथा माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक-सचिव - विश्वस्त-प्रा. सीए. डॉ. एम एस जाधव (सर), संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, सहसचिव दत्तात्रय गवळी,व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे कौतुक केले.

या उपक्रमासाठी इयत्ता नववीत शिकत असलेल्या ३२ विद्यार्थ्यांनी या प्रत्यक्ष भात लावणीचा कृतीयुक्त अनुभव घेतला. यावेळी विद्यालयातील शिक्षक प्रा संतोष नवले, सुनिल घोडके, शिवाजी गोडसे, बाळू पोमणे, शिक्षिका सौ कविता शेलार यांचेसह पुरंदर तालुका शिक्षकेतर संघटनेचे माजी अध्यक्ष पांडुरंग जाधव व रामभाऊ कुंभार आदी उपस्थित होते.